सार्थ श्री ज्ञानेश्वरी
अध्याय पहिला

श्रीमहागणपतये नमः ॥

ॐ नमो आद्या । वेदप्रतिपाद्या ।
जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ॥ १ ॥

हे ॐकारस्वरूप परमात्मा ! आणि जो वेदांचाही प्रतिपाद्य विषय आहे, केवळ स्वानुभवानेंच ज्याचें ज्ञान होऊं शकते अशा आत्मस्वरूपा ! तुला मी नमस्कार करतो.

देवा तूं चि गणेशु । सकलार्थप्रकाशु ।
ह्मणे निवृत्तिदासु । अवधारिजो ॥ २ ॥

देवा, सर्वांच्याबुद्धीला प्रकाशित करणारा जो गणेश, तो तूच आहेस. श्रीनिवृत्तिनाथांचा नम्र शिष्य ज्ञानदेव आतां जे बोलेल, त्याकडे तुझें लक्ष असूं दे.

हें शब्दब्रह्म अशेष । ते चि मूर्ति सुरेख ।
जेथें वर्णवपु निर्दोष । मिरवत असे ॥ ३ ॥

वेद हेच संपूर्ण शब्दब्रह्म होय, व तेच गणेशाच्या ठिकाणी मूर्तिमंत झाले आहेत. निर्दोष वर्ण हेच त्यांचे दिव्य शरीर होय.

स्मृति ते चि अवयव । रेखा अंगिकभाव ।
तेथ लावण्याची ठेव । अर्थशोभा ॥ ४ ॥

निरनिराळ्या स्मृति हेच त्या शरीराचे स्वाभाविक अंगभूत अवयव आहेत. व त्यांतील अर्थ ही सौंदर्याची खाणच भासत आहे;

अष्टादश पुराणें । तियें चि मणिभूषणें ।
पदपद्धति खेवणें । प्रमेयरत्नांचीं ॥ ५ ॥

अठरा पुराणे ही गणेशाच्या वर्णरूपी शरीरावरील रत्नालंकार आहेत; आणि पदपद्धती म्हणजे शब्दरचनेचे उत्तमोत्तम तत्त्वें, छंन्दमय काव्यपंक्ती, ही त्या रत्नांचीं कोंदणे.

पद्यबंध नागर । तें चि रंगाथिलें अंबर ।
जेथ साहित्यवाणें सपुर । उजळाचें ॥ ६ ॥

उत्तम सुसंस्कृत शब्दांची मांडणी हेच अंगावरील रंगविलेंले वस्त्र आहे; त्यातील भरपूर उपमादि अलंकारसाहित्य हे त्याच्या वस्त्राचे उज्वल असे सूत आहे.

देखां काव्यनाटका । जिं निर्ध्दारितां सकौतुका ।
तिया चि रुणुझुणिति क्षुद्रघंटिका । अर्थध्वनि ॥ ७ ॥

काव्ये व नाटके यांची केलेली योजना यांचा कौतुकाने विचार केला असता तीं काव्ये व नाटकें पायांतील घागऱ्या असून त्यातील ध्वन्यर्थ हाच त्या घागऱ्यांचा रुणझुण नाद होय.

नाना प्रमेयाची परि । निपुणपणें पांतां कुसरि ।
दीसति उचित पदें माझारि । रत्नें भलीं ॥ ८ ॥

अक्षरबद्ध झालेली ही विचाररूप तत्त्वें व त्यांतील कुशलता यांचा बारकाईनें विचार केल्यास असे दिसते कीं ते सिद्धान्त व्यक्त करणारी योग्य पदे हीच त्यातील रत्ने होत.

तेथ व्यासादिकांचिया मती । चोखडेपणें झळकती ।
तिया मेखळे मिरवती । पल्लवसडका ॥ ९ ॥

व्यास, वाल्मीकी इत्यादी महाकवींची प्रगल्भ बुद्धीच त्यावरील मेखलेल्या ठिकाणीं शोभते, त्यातील स्पष्टपणे झळकणारे विचार मेखलेच्या पदराच्या शेंड्यांप्रमाणें झळकत आहेत.

देखां षड्दर्शनें ह्मणिपति । ते चि भुजांची आकृति ।
म्हणूनि विसंवादें धरिति । आयुधांतें ॥ १० ॥

वैदिक षड्दर्शने जी म्हटली जातात तेच गणपतीचे सहा हात आहेत याच कारणास्तव या हातांतील आयुधेंही परस्परांशी विसंवादी अशीं आहेत.

तरि तर्कु तो चि परशु । नीतिभेदु अंकुशु ।
वेदांत महारसु । मोदकु मिरवे ॥ ११ ॥

एका हाती दंतु । जो स्वभावता खंडितु ।
तो बौधमतसंकेतु । वार्त्तिकांचा ॥ १२ ॥

मग साहाजें सत्तर्कवादु । तो पद्मकरु वरदु ।
धर्मप्रतिष्ठा तो सिद्धु । अभयहस्तु ॥ १३ ॥

देखां विवेकवंतु विमळु । तो चि शुंडादंडु सरळु ।
जेथ परमानंदु केवळु । महासुखाचा ॥ १४ ॥

तरि संवादु तो चि दशनु । समता शुभ्रवर्णु ।
देॐ उन्मेखु सूक्ष्मेक्षणु । विघ्नराजु ॥ १५ ॥

मज अवगमलिया दोन्हीं । मीमांसा श्रवणस्थानीं ।
बोधमदामृत मुनी- । अलि सेविति ॥ १६ ॥

प्रमेयप्रवाळसुप्रभ । द्वैताद्वैतनिकुंभ ।
सरिसे एकवटति ईभ- । मस्तकावरि ॥ १७ ॥

उपरि दशोपनिषदें । जियें उदारें ज्ञानमकरंदें ।
तियें मुकुटीं कुसुमें सुगंधें । शोभते भलीं ॥ १८ ॥

अकार चरणयुगुळ । उकार उदर विशाळ ।
मकारु महामंडळ । मस्तकाकारें ॥ १९ ॥

हे तिन्ही एकवटले । तेथ शब्दब्रह्म कवळलें ।
तें मियां गुरुकृपा नमिलें । आदिबीज ॥ २० ॥

आतां अभिनववाग्विलासिनी । जे चातुर्यकळाकामिनी ।
ते शारदा विश्वमोहिनी । नमिली मियां ॥ २१ ॥

तर्क हा हातातील परशु आहे, नीतिभेद हा अंकुश होय, वेदान्त
म्हणजे ब्रह्मानंद देणारा प्रतीकात्मक मोदक त्याच्या एका हातात आहे

वार्तिककारांच्या व्याख्यानानें स्वभावतःच खंडित झालेलें बौध्दमत,
हें एका हातांत असणाऱ्या मोडक्या दांताच्या ठिकाणीं शोभतें;

मग सहजच येणारा निरीश्वर सांख्यांचा सत्कारवाद हाच वर देणारा
वरदहस्त, धर्म प्रतिष्ठा यांची ज्यापासून स्थापना होते, तो अभयहस्त होय.

ज्या ठिकाणी शुद्ध विवेक आहे व सरळ विचारांचा प्रादुर्भाव होउन केवळ परमानंद आहे,
शुभाशुभाचा विवेक व बऱ्यावाईटाची निवड करण्यांत समर्थ अशी लांब सोंड आहे.

तसाच उत्तम संवाद हा या विघ्नराज देवाचा शुभ्र दंत, साम्यबुद्धीची विमलताच दर्शवितो व
परस्पर संवाद त्याने शक्य होतो, उन्मेष हेच या विघ्नराज गणेशदेवाचे किलकिले सूक्ष्म नेत्र होत.

पूर्वमीमांसा व उत्तममीमांसा ह्या दोन मीमांसा मला कानांच्या ठिकाणीं भासल्या; आणि
गंडस्थळींचा मद हेच आत्मबोधरूपी अमृत असून, मुनिरूपी भ्रमर त्याचे सेवन करतात.

तेजस्वी प्रवाळाप्रमाणे असलेले द्वैत व अद्वैत ही दोन प्रमेये हीच
दोन गंडस्थळे होत. तीं तुल्यबलानें तेथें एकत्र राहिलीं आहेत.

शिवाय ज्ञानरूप मकरंदानें ओतप्रोत भरलेलीं दहा उपनिषदें हींच
सुगंधी फुलें गंडस्थळावर असलेल्या मुकुटाच्या ठिकाणीं चांगलीं शोभतात.

ॐकारांतील अकार हा दोन्ही चरणांचे ठिकाणीं, उकार हा
विशाल उदराचे ठिकाणीं, आणि मकार हें मस्तकांचे महामंडळ आहे;

अकार उकार मकार ह्या तिन्ही मात्रा ज्या ॐकारात एकरूप आहेत, त्यातच सर्व
वाङ्‌विश्व सामावते, त्या मूळ ओंकाररूप गणपतीला मी गुरुकृपेनें नमस्कार करतों.

आतां अपूर्व अशा वाणीचे ठिकाणीं विलास करणारी, चातुर्य, अर्थ व कला यांची
स्वामिनी, व जिने सर्व जग मोहून टाकलें आहे, त्या सरस्वतीस मी नमस्कार करतों.

मज हृदइं सद्गुरु । तेणें तारिलों संसारपुरु ।
ह्मणौनि विशेषें मती आदरु । विवेकावरि ॥ २२ ॥

माझ्या हृदयात सदगुरु विवेकरुपाने वास करतात, त्यामुळे हा संसारूपी महापूर
मी तरून गेलों. म्हणून त्या विवेकाविषयी माझ्या मनांत अत्यंत आदर आहे.

जैसें डोळेयां अजंन भेटे । तेव्हळि दृष्टीसि पाटा फुटे ।
मग वास पाहिजे तेथ प्रकटे । महानिधि ॥ २३ ॥

डोळ्यांत दिव्य अंजन घातले तर दृष्टी विकसित होते आणि मग जें
जें स्थळ पहावें, तेथें तेथें द्रव्याचे भूमिगत प्रचंड ठेवे दिसूं लागतात.

कां चिंतामणि जालेयां हातीं । सदा विजयेपण मनोरथीं ।
तैसा पूर्णकाम निवृत्ती । ज्ञानदेॐ ह्मणे ॥ २४ ॥

किंवा मनोरथ पूर्ण करणारा चिंतामणि हातीं आला असतां सर्व हेतु पूर्ण होतात, तशी
निवृत्तिनाथांची कृपा झाल्यामुळे माझी सर्व मनोकामना पूर्ण झाली आहे. असे ज्ञानदेव म्हणतात.

जाणतेन गुरु भजिजे । जेणें कृतकार्या होइजे ।
जैसें मूळसिंचनिं साहाजें । निगति शाखापल्लव ॥ २५ ॥

म्हणून सुज्ञ माणसाने गुरुला भजावे, आणि त्या योगानें कृतकृत्य व्हावें. ज्याप्रमाणें
वृक्षाच्या मुळाशी पाणी घातले म्हणजे त्याच्या फांद्या व पाने सहजच तरतरीत होतात.

कां तीर्थें जियें त्रिभुवनी । तियें घडति समुद्रावगाहनीं ।
ना तरि अमृतरसास्वादनीं । रस सकळ ॥ २६ ॥

किंवा जगातील सर्व तीर्थांत स्नान केल्याचे पुण्य एका समुद्रस्नानानेच
मिळते, किंवा अमृतरसाच्या सेवनानें सर्व रसांचे सेवन घडतें.

तैसा पुडुतीं पुडुतीं तो चि । मियां वंदिला श्रीगुरु चि ।
जो अभिलखित मनोरथु चि । पुरविता ॥ २७ ॥

म्हणून माझ्या मनातील अत्यंत आवडीची सर्व अभिलाषा पुरविणारा
जो माझा गुरू, त्याच श्रीगुरुला मी वारंवार पुज्यताबुध्दीनें नमन केले.

आतां अवधारा कथा गहन । जे कळाकौतुकां जन्मस्थान ।
किं अभिनव उद्यानवन । विवेकतरुचें ॥ २८ ॥

अता भारताची ही गहन कथा लक्षात घ्या, ही सर्व कौतुकांची
जन्मभूमि आहे, किंवा विवेकरूपी वृक्षांचे ते विलक्षण उद्यानच आहे.

ना तरि सर्वसुखाची आदि । जे प्रमेयमहानिधि ।
नाना नवरससुधाब्धी । परिपूर्ण हा ॥ २९ ॥

अथवा, ही सर्व सुखाचे उगमस्थान आहे, अनेक महासिद्धान्तांचा
सांठा आहे, आणि वीररसादी नवरसांचा अमृतमय सागरच आहे.

किं परमधाम प्रकट । हें विद्यांचें मूळपीठ ।
शास्त्रजातां वसैठ । अशेषांचा ॥ ३० ॥

हे सर्व विद्यांचे मूळ पीठ आहे, अखिल शास्त्रांचे निवासस्थान
आहे, आणि परमधाम अर्थात स्वयेच मोक्षरूप आहे.

ना तरि सकळ धर्माचें माह्येर । सज्जनाचें जिव्हार ।
लावण्यरत्नभांडार । शारदेचें ॥ ३१ ॥

किंवा ही कथा धर्माचें माहेरघर आहे, सज्जनांचा जिव्हाळा आहे;
सरस्वतीच्या साहित्य-सौंदर्यरूपी रत्नांचा खजिनाच आहे.

नाना कथारूपें भारती । प्रकटली असे त्रिजगती ।
आविष्करौनि महामती । व्यासाचिये ॥ ३२ ॥

किंवा व्यासांच्या विशाल मतीला स्फुरण देऊन या कथेच्या
रूपानें सरस्वती या तिन्ही लोकांमध्यें प्रकट झाली आहे.

ह्मणौनि महाकाव्यां राॐ । ग्रंथु गरुवतिचा ठाॐ ।
एथौनि रसां जाला आहो । रसाळपणाचा ॥ ३३ ॥

म्हणून हा सर्व काव्यग्रंथांचा राजा आहे. इतर सर्व ग्रथांच्या श्रेष्ठपणाचे एकमेव राहते ठिकाण होय, हिच्यापासून साहित्यातील शृंगारादिक नवरसांना रसाळपणाचा विशेष डौल आला.

तेविं चि आइकां आणिक ही एक । एथौनि शब्दश्री भली शास्त्रिक ।
आणिक महाबोधीं कोवळिक । दुणावली ॥ ३४ ॥

त्याचप्रमाणें याची आणखी एक महती ऐका. याच्यामुळें शब्दांच्या वैभवाला निर्दोष शास्त्र शुध्दता गंवसली आहे. आत्मबोधाच्या ठिकाणीं दुप्पट कोमलपणा आला.

एथ चातुर्य सिहाणें जालें । प्रेम रुचीसि आलें ।
आणि सौभाग्य पोखलें । सुखाचें एथ ॥ ३५ ॥

या कथेपासूनच चातुर्य शहाणें झालें, तत्त्वार्थाला जास्त रुचि आली सुखाला भगवंताच्या कृपेचे भाग्य जोडले गेले.

माधुर्या मधुरता । श्रिंगारिं सुरेखता ।
रूढपण उचिता । दीसे भलें ॥ ३६ ॥

गोडीचा गोडपणा, श्रृंगाराचा सुरेखपणा, आणि योग्य गोष्टीनां लोकप्रियतेची, जोड लागून शोभा आली आहे.

एथ कळाविदपण कळां । पुण्यासि प्रतापु आगळा ।
ह्मणौनि जन्मेजयाचे अवलीळा । दोष गेले ॥ ३७ ॥

या कथेपासूनच कलांना कलाज्ञान लाभलें; पुण्याला अपूर्व वैभव मिळालें, आणि श्रवणमात्रे जनमेजय निष्पाप झाला.

आणि पांतां नावेक । रंगीं सुरंगतेची आगळिक ।
गुणा सगुणपणाचे बीक । बहुवस एथें ॥ ३८ ॥

आणि जरासा खोल विचार केला तर असें निश्चित होतें, कीं, रंगांना सुरंगीपणाचें सामर्थ्य व गुणांना सद्गुणत्वाचें तेज या ग्रंथराजाच्या आश्रयानें मिळाले.

भानुचेनि तेजें ढवळलें । जैसें त्रैलोक्य दीसे उजळलें ।
तैसें व्यासमती कवळलें । सकळ मिरवे ॥ ३९ ॥

सूर्याचे तेजस्वी प्रकाशाने त्रैलोक्य जसे प्रकाशित झालेले दिसते त्याप्रमाणें व्यासाच्या बुध्दीने व्यापलेलें विश्व शोभतें.

कां सुक्षेत्रीं बीज घातलें । ते आपुलिया परी विस्तारलें ।
तैसें भारतीं सुरवाडले । अर्थजात ॥ ४० ॥

किंवा चांगल्या शेतांत बीं पेरलें असतां त्याचा जसा उत्तम विस्तार होतो, त्याप्रमाणे चारी पुरुषार्थ या भारत ग्रंथांत सफल झाले आहेत

ना तरि नगरांतरीं वसिजे˙ तरि नागरां चि होईजे ।
तैसें व्यासोक्तितेजें । ढवळलें सकळ ॥ ४१ ॥

किंवा ज्याप्रमाणे शहरात राहणारा मनुष्य सुविद्य, चतुर, शहाणा होतो त्याप्रमाणे सर्व जग व्यासांच्या प्रज्ञायुक्त वचनानी धवल झाले आहे.

किं प्रथमवयसा काळीं । लावण्याची नव्हाळी ।
प्रकटे जैसी आगळी । अंगनाअंगीं ॥ ४२ ॥

किंवा, तारुण्यावस्थेंत स्त्रियांच्या ठिकाणी ज्याप्रमाणें लावण्याच्या नव नवतीची अपूर्व शोभा प्रकट होते.

ना तरि उद्यानीं माधवी घडे । तैं वनशोभेची खाणि उघडे ।
आदिलापासौनि अपाडें । जियापरीं ॥ ४३ ॥

किंवा बगीच्यात वसंतऋतूने प्रवेश केला असता वनशोभेची जणूं खाणच उघडावी तसे तेथे निसर्गसौंदर्य पहिल्यापेक्षा जास्तच खुलून दिसते.

नाना घनीभूत सुवर्ण । जैसें निहाळितां साधारण ।
मग अळंकारीं बरवेपण । निवाडु दावी ॥ ४४ ॥

सोन्याची लगड पाहिली तर पीतवर्णाचा एक साधारण आकार दिसतो, पण त्याच लगडीचे दागिने बनविल्यावर तेंच सानें आपलें सौंदर्य कांहीं निराळेच दाखवितें.

तैसें व्यासोक्ति अळंकरलें । आवडतें बरवेपण पातलें ।
तें जाणौनि चि काइ आश्रइलें । इतिहासीं ॥ ४५ ॥

व्यासवचनांचे अलंकार घातले तर आपण अधिकच सुंदर दिसू हे ओळखूनच की काय, इतिहासांने आपण होऊनच त्या कथेचा आश्रय केला.

नाना पुरतिये प्रतिष्ठेलागि । सानीव धरूनि आंगीं ।
पुराणें आख्यानरूपें जगीं । भारता आलीं ॥ ४६ ॥

आणि आपल्याला पूर्ण प्रतिष्ठा प्राप्त व्हावी या हेतूने पुराणे लहानपणा धरून, आख्यानरूपानें भारतांत येऊन जगांत प्रसिद्धीस आलीं.

ह्मणौनि भारतीं नाहीं । तें नव्हे चि लोकीं तिहीं ।
एणें कारणें ह्मणिपे पाहीं । व्यासोच्छिष्ट जगत्रय ॥ ४७ ॥

म्हणून, भारतांत जी कथा नाहीं ती त्रैलोक्यांतही नाहीं. म्हणूनच सर्व साहित्यविश्व हें व्यासांचे उच्छिष्ट आहे, असें म्हटले जातें.

ऐसी सुरस जगीं कथा । जे जन्मभूमि परमार्था ।
मुनि सांधे नृपनाथा । जन्मेजया ॥ ४८ ॥

जणूं मोक्षाची जन्मभूमीच, अशी ही रसपूर्ण या नांवें अखिल विश्वांत विख्यात असलेली कथा, जनमेजय राजाला वैशंपायन ऋषींनी सांगितली.

जे अद्वितीय उत्तम । पवित्रैक निरूपम ।
परमंगळ धाम । अवधारिजे ॥ ४९ ॥

ही कथा अद्वितीय, उत्तम, अति पवित्र, निरूपम आहे हिच्या बरोबरीची पावन करणारी दुसरी कथा नाही. अशी ही कथा सावधपणें श्रवण करावी.

आतां भारतकमळपरागु । गीताख्यु प्रसंगु ।
जो संवादला श्रीरंगु । अर्जुनेंसीं ॥ ५० ॥

आतां जो श्रीकृष्णानें अर्जुनाला संवादरूपानें उपदेशिला, तो गीतानावाचा प्रसंग भारतामध्यें कमलांतील परागाप्रमाणें आहे.

ना तरी शब्दब्रह्माब्धी । मथिलें व्यासबुद्धी ।
निवडलें निरवधी । नवनीत हें ॥ ५१ ॥

किंवा असे म्हणता येईल कीं शब्दब्रह्म म्हणजे जे वेद तोच एक क्षीरसागर आहे आणि व्यासांनी बुद्धिरूपी रवीने त्याचे मंथन करून गीतारूपी उत्तम लोणी काढले.

मग ज्ञानाग्निसंपर्कें । कडसिलें विवेकें ।
पदा आलें परिपाकें । आमोदासीं ॥ ५२ ॥

मग तें विवेकाच्या साह्यानें ज्ञानरूपी अग्नीची आंच देऊन कढविलें. तेव्हा त्याचे सुवासिक तूप बनले, तोच निजरूपाचा अनुभव होय.

जें अपेक्षिजे विरक्तीं । अनुभविजे संतीं ।
सोहंभावें पारंगतीं । रमिजे जेथ ॥ ५३ ॥

वैराग्यशील पुरुष ज्याची इच्छा करतात, संत नेहमीं अनुभवितात, आणि पूर्ण ब्रह्मज्ञानी ज्यामध्यें 'सोऽहं जपाच्या द्वारा या निजबोधात तल्लीन होतात.

जें आकर्णिजे भक्ति । आदिवंद्य त्रिजगती ।
तें भीष्मपर्वीं संगति । सांधिजैल ॥ ५४ ॥

भक्त जिचे श्रवण करितात, जी तिन्ही लोकांत प्रथम नमस्कार करण्यास योग्यती गीता महाभारताच्या भीष्मपर्वात सुसंगतवार मांडली आहे.

जे भगवद्गीता ह्मणिजे । जे ब्रह्मेशानीं प्रसंसिजे ।
जे सनकादिकीं सेविजे । आदरेंसीं ॥ ५५ ॥

जिला ' भगवद्गीता ' असें म्हणतात; ब्रह्मदेव व शंकर जिची प्रशंसा
करितात, सनकादि सिद्ध मोठ्या आदरानें हिचें मनन करितात.

जैसें शारदियेचिये चंद्रकळे- । माझि अमृतकण कोवळे ।
ते वेंचिति मनें मौआळें । चकोरतलगें ॥ ५६ ॥

ज्याप्रमाणे शरद ऋतूतील पूर्ण चंद्राच्या किरणातील सूक्ष्म अमृतमय
कण चकोरांची पिले मृदुपणे, किती अलगद प्राशन करतात,

तेयापरीं श्रोतां । अनुभवावी हे कथा ।
अति हळुवारपण चित्ता । आणूनियां ॥ ५७ ॥

त्याप्रमाणे श्रोत्यांनी चित्ताची एकाग्रता
करून या भगवद्गीतेचा अनुभव घ्यावा.

हें शब्देंविण संवादिजे । इंद्रियां नेणतां भोगिजे ।
बोलाआधीं झोंबिजे । प्रमेयासि ॥ ५८ ॥

हिची चर्चा शब्दांवाचून करावी इंद्रियांना पत्ता लागू न देतां हिचा उपभोग घ्यावा,
आणि बोल कानी पडण्याच्या पूर्वी तिच्यांतील तत्त्वसिध्दांत आकलन करावा.

जैसें भ्रमर परागु नेति । परि कमळदळें नेला नेणति ।
तैसी परि आहे सेविती । ग्रंथीं इये ॥ ५९ ॥

ज्याप्रमाणें भ्रमर कमलदलाला न समजूं देतां त्यांतील पुष्परेणु
सेवन करतात, या ग्रंथातील तत्त्वांचें सेवन याच पध्दतीनें करावें.

कां आपुला ठाॐ न संडितां । आळंगिजे चंद्रु प्रकटतां ।
हा अनुरागु भोगितां । कुमुदिनी जाणे ॥ ६० ॥

चंद्र विकासी कुमुदिनी उमलते ती चांदण्यातच पण आपली जागा न सोडतां
त्याला आलिंगन देते; हे कसब एक त्या कुमुदिनीलाच ठाऊक आहे.

ऐसेनि गंभिरपणें । थिरावलेनि अंतष्करणें ।
आथिला तो जाणे । मातु इये ॥ ६१ ॥

आशा स्थिर एकचित्ताने जो श्रवण करील तोच या
गीतोपदेशाचा अधिकारी होय व तोच या गीतेचे रहस्य जाणतो.

अहो अर्जुनाचिया पांती । जे परिसणेयां योग्य होंति ।
तिहीं कृपा करुनि संतिं । अवधान देयावें ॥ ६२ ॥

म्हणून जे गीताश्रवणप्रसंगीं अर्जुनाच्या पंक्तीस बसण्यास
योग्य आहेत, त्या संतांनी कृपाकरून या कथेकडे लक्ष द्यावे.

हें सलगी मियां ह्मणितलें । चरणालागौनि विनविलें ।
प्रभू सखोल हृदय आपुलें । ह्मणौनियां ॥ ६३ ॥

तुम्ही उदार व कनवाळू हृदयाचे आहात म्हणून हे संतरूपी देवांनो,
मी आपल्या चरणापाशी लडिवाळपणाने विनंती करीत आहे.

जैसा स्वभावो मायेबापांचा । अपत्य बोले जर्‍हीं बोबडिया वाचा ।
तर्‍हीं अधिकाधिक तेयांचा । संतोखु चि आथि ॥ ६४ ॥

आईवडलांचा स्वभाव असा असतो की त्यांचे मूल बोबडे
बोलले तरी त्यामुळें त्यांचा आनंद दुणावतच असतो.

तैसा तुह्मीं मी अंगिकारिलां । सज्जनीं आपुला ह्मणितलां ।
तरि उणावो साहाजें उपसाहला । प्रार्थुं काइ ॥ ६५ ॥

त्याप्रमाणे तुमच्याकडून माझा अंगीकार झाला आहे व मला 'आपला' म्हटलें आहे, त्या
अर्थी माझें जे कांहीं उणे असेल तें तुम्हीं सहज सहन कराल ! म्हणून वेगळी प्रार्थना कशाला ?

परि अपराधु तो आणिकु आहे । जें मीं गीतार्थु कळूं पाहें ।
तें अवधारां विनउं लाहें । ह्मणौनियां ॥ ६६ ॥

हें अनावरत विचारितां । वायां चि धिंवसा उपनला चित्ता ।
यऱ्हविं काइ भानुतेजीं खद्योता । शोभा आथि ॥ ६७ ॥

कां टिटिभुं चांचुवेऱ्हीं । माप सुये सागरीं ।
मीं नेणतु तियापरीं । प्रवर्ते एथ ॥ ६८ ॥

आइकां आकाश गंवसावें । तरि आणिक तैसें चि होआवें ।
ह्मणौनि अपाडु हें आघवें । निर्धारितां ॥ ६९ ॥

एया गीताशास्त्राची थोरी । स्वयं शंभुं विवरी ।
जेथ भवानी प्रष्णु करी । चमत्कारौनि ॥ ७० ॥

तेथ हरु ह्मणे जेवि नेणिजे । देवी जैसें कां स्वरूप तूझें ।
हें नित्य नूतन देखिजे । गीतातत्त्व ॥ ७१ ॥

हा वेदार्थु सागरु । जेया निद्रिताचा घोरु ।
तो स्वयें सर्वेश्वरु । अनुवादला ॥ ७२ ॥

ऐसें जें अगाध । जेथ वेडावति वेद ।
तेथ अल्प मीं अतिमंद । काइ होयें ॥ ७३ ॥

हें अपार कैसें कवळावें । महातेज कवणें ढवळावें ।
गगन मुठी सुआवें । मशकें केवि ॥ ७४ ॥

परि एथ असे एकु आधारु । तेणें चि बोलें मीं सधरु ।
जें सानुकूळ श्रीगुरु । ज्ञानदेउँ ह्मणे ॥ ७५ ॥

यऱ्हविं तऱ्हिं मीं मूर्खु । जऱ्हैं जाला असे अविवेकु ।
तऱ्ही संतकृपादीपकु । सोज्वळु असे ॥ ७६ ॥

परंतु माझ्याकडून दुसराच एक अपराध घडला आहे, मी तर गीतेचा अर्थ आकलन करण्याचे साहस करत आहें; आणि ते तुम्ही ऐकावे अशी विनंती करीत आहे

हें कार्य आवरण्यास किती कठीण आहे याचा विचार न करितां मी एकदम भलतेच धाडस करत आहे. काजव्याने सूर्याला प्रकाश आणि शोभा द्यावी काय ?

टिटवीची पिले सागरात पडली तेव्हा समुद्राचे पाणी आपल्या चोचीने शोषण करण्यास निघाली, त्याप्रमाणे मी अल्पज्ञ, गीतार्थ करण्यास करण्यास प्रवृत्त झालों आहें.

आकाशाला गवसणी घालायचा बेत केला तर आपण आकाशापेक्षा विशाल व्हायला हवे. गीतार्थ सांगण्याचे काम, विचारकेला असतां, माझ्या योग्यतेबाहेरचें आहे.

ह्या गीतार्थाचे माहात्म्य स्वतः शंकर स्पष्ट करून सांगण्यास बसले असता साक्षात् भवानीला चमत्कार वाटून तिनें शंकराला प्रश्न केला असतां,

त्यावर शंकर बोलले, कीं देवी, जसें तुझें स्वरूप कळायला अगम्य, तसा हा गीतार्थ नित्य नवीं रूपें धरीत असल्यामुळें त्याचाही पार लागत नाहीं.

ज्या सर्वेश्वराच्या केवळ योगनिद्रेतील घोरण्यापासून वेद उत्पन्न झाले, आणि ही गीता तर परमेश्वराने स्वतःच्या मुखाने जागृतीत सांगितली.

वेद हेही जेथे दिङ्मूढ होतात असे जर अगाध ज्ञान आहे तेथे अल्प व मतिमंद असा जो मी, त्या माझी काय कथा ?

या अमर्याद गीतार्थाचें कसें आकलन होणार ? महातेजाला अधिक लख्ख कसे करणार ? शुद्र चिलटानें मुठीत आकाश कसें धरावें ?

तरी ज्ञानदेव म्हणतात, 'या कांमी एक आधार आहे. तो म्हणजे श्रीगुरु निवृत्तिनाथ मला अनुकूल आहेत', महणून मी मोठ्या धैर्यानें बोलत आहे.

एरवीं मीं खरोखर मूर्ख असून अविचाराचीच गोष्ट करीत आहे; पण माझ्या दृष्टीसमोर संतकृपेचा दिवा तेजस्वी व स्पष्ट आहे.

लोहाचें कनक हाये । हें परिसिं सामर्थ्य आहे ।
कां मृत ही जीवित लाहे । अमृतसिद्धी ॥ ७७ ॥

लोखंडाचे सोने करावे ते परिसानेच. ते सामर्थ्य परिसामध्ये असते, किंवा अमृताच्या योगाने मेलेला पुरुषही जिवंत होतो.

जरि प्रकटे सिद्धसरस्वती । तरि मुंकेयां आथि भारती ।
एथ वस्तुसामर्थ्यशक्ती । नवल काइ ॥ ७८ ॥

अथवा सरस्वतीच प्रसन्न झाली तर मुक्याला देखील वाचा फुटते, दीप्तिमान वस्तूचें सामर्थ्यच हें असतें. यात आश्चर्य करण्याचें कारण नाहीं.

जेयातें कामधेनु ऐसी माये । तेयासि अप्राप्य काहीं आहे ।
ह्मणौनि मी प्रवर्तों लाहें । ग्रंथी इये ॥ ७९ ॥

कामधेनुच ज्याची आई, त्यांला दुर्लभ असें काय आहे ? म्हणून मी हा ग्रंथ रचण्यास सिध्द झालो आहें,

तऱ्हीं न्यून तें पुरतें । अधिक ही सरतें ।
करूनि घेयावें हें तुमतें । विनविलें मियां ॥ ८० ॥

तेव्हां " यांत कांहीं उणें असल्यास तें पुरें करून व कांहीं अधिक असल्यास तें प्रसंगोचित करून घ्यावें, " अशी माझी तुम्हास विनंती आहे.

आतां देइजे अवधान । तुह्मीं बोलविलां मीं बोलैन ।
जैसें चेष्टे सूत्राधीन । दारुयंत्र ॥ ८१ ॥

आता निरूपणाकडे लक्ष द्यावे. तुम्ही जसे बोलवाल तसे मी निरूपण करीन. ज्याप्रमाणें ज्याप्रमाणें लांकडाची कळसूत्री बाहुली दोऱ्याचे आधारानें नाचते,

तैसा मी अनुगृहीतु । साधूंचा निरोपितु ।
तो आपुला अळंकरितु । भलेतैसा ॥ ८२ ॥

त्याप्रमाणें मी साधुसंतांचा अनुग्रहीत, त्यांच्या कृपेचा आश्रित आहें. आता ते साधुजन आवडेल तसे आपल्या लेकराला अलंकृत करतील.

तंव गुरु ह्मणति राहीं । हें तुज बोलावें न लगे काहीं ।
आतां ग्रंथा चित्त देइं । झडकरि गा ॥ ८३ ॥

तेव्हां श्रीगुरु म्हणतात; 'पुरे, हें सांगण्याची तुला कोणतीच आवश्यकता नाहीं, आता लवकर गीता ग्रंथाकडे लक्ष दे व सांगायला प्रारंभ कर'.

एया बोला निवृत्तिदासु । पावौनि परम उल्हासु ।
ह्मणे परियसां मना अवकाशु । देउनियां ॥ ८४ ॥

निवृत्तिदास ज्ञानदेव, या आश्वासनामुळें अतिशय संतुष्ट होऊन म्हणतात कीं, 'मी बोलतों तें स्वस्थ मनानें ऐका'.

धृतराष्ट्र उवाच -
धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः ।
मामकाः पाण्डवाश्चैव किमकुर्वत संजय ॥ १ ॥

धर्मक्षेत्रे, कुरूक्षेत्रे, समवेता, युयुत्सवः
मामकाः, पाण्डवाः, च, एव, किम्, अकुर्वत संजय

राजा धृतराष्ट्र म्हणतो, हे संजया ! धर्माचें स्थान अशा कुरुक्षेत्रा मध्यें जमलेले आणि युध्दाची इच्छा करणारे, माझ्या व पंडूचे मुलांनी काय केलें ?

पुत्रस्नेहें मोहितु । धृतराष्ट्रु असे पूसतु ।
सांघें संजया मातु । कुरुक्षेत्रिची ॥ ८५ ॥

पुत्रा प्रेमानें मोहित झालेला धृतराष्ट् संजयाला म्हणाला, संजया, कुरुक्षेत्राची काय हकीगत आहे ती मला सांग.

जें धर्मालय ह्मणिजे । तेथ पांडव आणि माझे ।
गेले असति व्याजें । झूझाचेनि ॥ ८६ ॥

धर्माचे क्षेत्र असे जे मानले जाते त्या कुरुक्षेत्रात
माझे पुत्र आणि पांडव युद्धा साठी गेले आहेत,

तरि ते चि येतुलां अवसरीं । काय कीजतसे येरयेरीं ।
हें झडकरि कथन करीं । मजप्रति ॥ ८७ ॥

तर ते परस्परांत एव्हढा वेळपर्यंत
काय करीत आहेत तें मला लवकर सांग.

संजय उवाच -
दृष्ट्वा तु पाण्डवानीकं व्यूढं दुर्योधनस्तदा ।
आचार्यमुपसङ्गम्य राजा वचनमब्रवीत् ॥ २ ॥

दृष्ट्वा, तु, पाण्डवानीकम्, व्यूढम्, दुर्योधनः, तदा
आचार्यम्, उपसङ्गम्य, राजा, वचनम्, अब्रवीत्

संजय म्हणतो "राजा धृतराष्ट्रा ! व्यूहरचित पांडवाचे सैन्य उभें
असलेलें पाहून, दुर्योधन राजा द्रोणाचार्याजवळ जाऊन त्यांस म्हणाला,

पश्यैतां पाण्डुपुत्राणां आचार्य महतीं चमूम् ।
व्यूढां द्रुपदपुत्रेण तव शिष्येण धीमता ॥ ३ ॥

पश्य, एताम्, पाण्डुपुत्राणाम्, आचार्य, महतीम्,चमुम्,
व्यूढां, द्रुपदपुत्रेण, तव, शिष्येण, धीमता

अहो आचार्य ! आपल्या बुद्धिमान शिष्याने द्रुपदपुत्र
धृष्टद्युम्नानें व्यूह रचलेली पांडवांची ही मोठी सेना पहा.

तेव्हांळि संजयो बोले । ह्मणे पांडवसैन्य उचललें ।
जैसें महाप्रळयीं पसरलें । कृतांतमुख ॥ ८८ ॥

त्यावेळी तो संजय म्हणाला, युद्धाकरिता खवळलेले पांडवांचे
सैन्य प्रलय काळाने तोंड उघडावे तसे भयंकर दिसत होते.

तैसें तें घनदाट । उठावलें एकावट ।
जैसें उलंडलें । काळकूट । धरी कवण ॥ ८९ ॥

अशा प्रकारें सर्व पांडव सैन्य एकदम तयार झालें, तेव्हां त्याला कोण आवरणार ?
ज्याप्रमाणें काळकूट एकदां उसळलें म्हणजे त्याचें शमन करण्याला कोण समर्थ आहे ?

ना तरि वडवानळु सांदुकला । प्रळयवातें पोखला ।
सागरु शोषूनि उधवला । अंबरासि ॥ ९० ॥

किंवा वडवानल पेटून प्रलयवातानें भडकल्यावर तो समुद्रातले
पाणी शोषण करतो व आकाशापर्यंत त्याच्या ज्वाळा जातात.

तैसें दळ दुर्धर । नाना व्यूहीं परिकर ।
आवरलें भयासुर । तिये काळीं ॥ ९१ ॥

त्याप्रमाणे पांडवांचे अफाट व अनेकप्रकारच्या व्यूहरचनेनें
तयार केलेलें सैन्य त्या काळीं फारच भेसूर वाटलें.

तें देखिलेयां दुर्योधनें । अव्हेरिलें कवणें मानें ।
जैसें न गणिजे पंचाननें । गजघंटांतें ॥ ९२ ॥

ज्याप्रमाणें हत्तींच्या कळपांना सिंह मुळीच मोजीत नाहीं,
त्याप्रमाणें दुर्योधनानें त्या सैन्याला विशेष महत्त्व दिले नाही.

ओवी	अर्थ
मग द्रोणापासीं आला । तेयातें ह्मणे हा देखिला । कैसा दळभारु उचलला । पांडवांचा ॥ ९३ ॥	नंतर दुर्योधन द्रोणाचार्याजवळ येऊन त्यांना म्हणाला, पांडवांच्या सैन्य भारानें कसा उठाव केला आहे, तें आपण पाहिलें काय ?
गिरिदुर्ग जैसें चालतें । तैसे विविध व्यूह भंवते । हे रचिले आहाति बुद्धिमंते । द्रुपदकुमरें ॥ ९४ ॥	बुद्धिमान असा जो द्रुपदपुत्र धृष्टद्युम्न, त्यानें त्या सैन्याची अशी चमत्कारिक रचना केली आहे की, ते चालत्या डोंगरी किल्ल्याप्रमाणेच दिसत आहे,
जो कां तुह्मीं सिक्ष्यापिला । विद्येसि वसैठा केला । तेणें हा सैन्यसिंधु पाखरिला । देख देख ॥ ९५ ॥	ज्या धृष्टद्युम्नाला तुम्हीं पढवून विद्येचें आगर केलें, त्यानें सेना समुद्र चहूंकडे पसरविला आहे तो पहा.

श्लोक	पदच्छेद
अत्र शूरा महेष्वासा भीमार्जुनसमा युधि । युयुधानो विराटश्च द्रुपदश्च महारथः ॥ ४ ॥	अत्र, शूराः, महेष्वासाः,भीमार्जुनसमाः, युधि, युयुधानः, विराटः, च, द्रुपदः, च, महारथः

येथें या सैन्यांत भीम अर्जुन यांच्या सारखे अनेक शूर वीर
आहेत, त्यांची नांवें अशीं, सात्यकी, विराट, आणि महारथी द्रुपद,

ओवी	अर्थ
आणिक ही एथ असाधारण । जे शस्त्रास्त्रीं भले प्रवीण । ते क्षात्रधर्मी निपुण । वीर आहाति ॥ ९६ ॥	आणिकही पांडवसैन्यात शस्त्र व अस्त्र यात विशेष प्रवीण क्षत्रिय धर्मात श्रेष्ठ असे आणि धनुर्विद्येत महान असे आणखी वीर आहेत,
बळें प्रौठी पौरुषें । जे भीमार्जुनासारिखे । ते सांघैन कवतिकें । प्रसंगें चि ॥ ९७ ॥	जे बळात, थोरवीत व पराक्रमात भीमार्जुनासारखे आहेत, असे पुष्कळ वीर पांडवसैन्यात आहेत त्याचीं नावे या प्रसंगी सांगतो.
एथ युयुधानु सुभटु । आला असे विराटु । महारथी श्रेष्ठु । द्रपदु वीरु ॥ ९८ ॥	या ठिकाणीं महायोध्दा युयुधान, विराट राजा आणि महारथी द्रुपद राजा हे आले आहेत.

श्लोक	पदच्छेद
धृष्टकेतुश्चेकितानः काशिराजश्च वीर्यवान् । पुरुजित्कुन्तिभोजश्च शैब्यश्च नरपुङ्गवः ॥ ५ ॥	धृष्टकेतुः, चेकितानः, काशिराजः, च, वीर्यवान्, पुरुजित्, कुन्तिभोजः, च, शैब्यः, च, नरपुङ्गव

धृष्टकेतू, चेकितान, व बलवान् काशीराज,
पुरुजित्, कुंतिभोज, व नरवीर शैब्य,

श्लोक	पदच्छेद
युधामन्युश्च विक्रान्त उत्तमौजाश्च वीर्यवान् । सौभद्रो द्रौपदेयाश्च सर्व एव महारथाः ॥ ६ ॥	युधामन्युः, च, विक्रान्तः, उत्तमौजाः, च, वीर्यवान् सौभद्रः, द्रौपदेयाः, च, सर्वे, एव, महारथाः

आणि पराक्रमी युधामन्यु, तसेच बलवान् उत्तमौजा, सुभद्रापुत्र
अभिमन्यु आणि द्रौपदीचे पांच पुत्र हे सर्व महारथी आहेत.

चेकितानु धृष्टकेतु । काशीश्वरु विक्रांतु ।
उत्तमौजा नृपनाथु । शैब्यु देख ॥ ९९ ॥

धृष्टकेतू, चेकितान, आणि वीर्यसंपन्न काशीराज,
पुरुजित्, कुंतिभोज तसाच नरवीर शैब्य,

हा कुंतिभोजु पाहे । एथ युधामन्यु आला आहे ।
आणि पुरुजितादि राये । सकळै जाणैं ॥ १०० ॥

हा कुंतिभोज पहा, येथें हा युधामन्यु आला आहे,
आणि पुरुजित् आदिकरून इत्यादी राजे या इकडे पहा.

हा सुभाद्राहृदयनंदनु । जो अपरु नवा अर्जुनु ।
तो अभिमन्यु ह्मणे दुर्योधनु । देखें द्रोणा ॥ १०१ ॥

दुर्योधन द्रोणास सांगतो, "हा पहा सुभद्रेच्या अंतःकरणाला
आनंद देणारा व प्रतिअर्जुन असा तिचा मुलगा अभिमन्यु.

आणिक ही द्रौपदिकुमर । जे सकळ ही महारथी वीर ।
मीति नेणिजे अपार । मीनले असति ॥ १०२ ॥

आणखी हे द्रौपदीचे मुलगे पहा. हे सर्व महारथी असून, असे
जे पुष्कळ वीर येथे आले आहेत त्यांची संख्या करवत नाही.

अस्माकं तु विशिष्टा ये तन्निबोध ध्दिजोत्तम
नायका मम सैन्यस्य संज्ञार्थं तान्ब्रवीमि ते ॥ ७ ॥

अस्माकम्, तु, विशिष्टाः, ये, तान्, निबोध, द्विजोत्तम्,
नायकाः, मम, सैन्यस्य, संज्ञार्थम्, तान्, ब्रवीमि, ते

अहो द्विजश्रेष्ठ, आतां, आमच्या पक्षांत ही जे प्रमुख आहेत, त्यानां आपण समजुन
घ्या, आपणाला समजण्यासाठीं माझ्या सेनेचे जे नायक आहेत ते सांगतो.

आतां आमचां दळीं नायक । जे रूढ वीर सैनिक ।
ते प्रसंगें आइक । सांघैन मी ॥ १०३ ॥

आतां, आमच्या सैन्यांत प्रमुख असे महावीर
कोणकोण आहे ते प्रसंगाच्या ओघानेंच सांगतों. ऐका.

उद्देशें एक दोनि । जाइजति बोलौनि ।
तुह्मीं आदिकरूनि । मुख्य जे जे ॥ १०४ ॥

तुमच्यासारखे जे जे पहिल्या प्रतीचे मुख्य वीर आहेत
त्या एक दोघांचा केवळ दिग्दर्शनापुरताच उल्लेख करितों.

भवान्भीष्मश्च कर्णश्च कृपश्च समितिञ्जयः ।
अश्वत्थामा विकर्णश्च सौमदत्तिस्तथैव च ॥ ८ ॥

भवान्, भीष्मः, च, कर्णः, च, कृपः, च, समितिंजयः,
अश्वत्थामा, विकर्णः, च, सौमदत्तिः, तथा, एव, च

आपण स्वतः, भीष्माचार्य, कर्ण सदा विजयी असे कृपाचार्य, व
समितिंजय, अश्वस्थामा, विकर्ण त्याच प्रमाणें सौमदत्ताचा पुत्र भूरिश्रवा,

हा भीष्म गंगानंदनु । जो प्रतापतेजस्वी भानु ।
रिपुगजपंचाननु । कर्ण वीरु ॥ १०५ ॥

आपल्या तेजस्वी प्रतापामुळें जो केवळ सूर्यासारखा, असा हा गंगापुत्र भीष्म, शत्रुरूपी गजसमुदायांत जणू सिंहच, असा वीर कर्ण !

एकैकाचेनि मनोव्यापारें । हें विश्व होये संहरे ।
हा कृपाचार्यु न पुरे । एकला चि ॥ १०६ ॥

या एकेकाने नुसते मनात आणल्यास सर्व सृष्टीचा संहार होईल. या कामासाठीं हे एकटे कृपाचार्य देखील पुरेसे आहेत.

एथ विकर्ण वीरु आहे । हा अश्वत्थामा पैलु पाहे ।
जेयाचा आडदरु सदा वाहे । कृतांतु मनीं ॥ १०७ ॥

येथ हा विकर्ण वीर आहे. हा त्याच्यापलीकडेंच असलेला अश्वत्थामा पहा. याचे काळाला देखील सदा भय वाटत असते.

समितिंजयो सौमदत्ति । ऐसे आणिक ही बहुत असति ।
जेयांचेया बळाची मीती । धाता नेणे ॥ १०८ ॥

युध्दामध्यें सदैव विजयी होत असलेला हा सोमदत्ति, त्याचप्रमाणें, ज्यांच्या पराक्रमाची कल्पना प्रत्यक्ष ब्रह्मदेवालाही लागत नाहीं असे आणखीही किती तरी वीर आहेत,

न्ये च बहवः शूरा मदर्थे त्यक्तजीविताः ।
नानाशस्त्रप्रहरणाः सर्वे युध्दविशारदः ॥ ९ ॥

अन्ये, च, बहवः शूराः, मदर्थे, त्यक्तजीविताः,
नानाशस्त्रप्रहरणाः, सर्वे, युध्दविशारदाः

दुसरे आणखी पुष्कळ शूरवीर अनेक प्रकारच्या शस्त्रास्त्रांनी युक्त,
माझ्यासाठीं प्राणांवर उदार झालेल, सर्वही युध्द कलेंत प्रवीण आहेत.

जे शास्त्रविद्यापारंगत । मंत्रावतार मूर्त्त ।
हो काज अस्त्रजात । एथौनि रूढि ॥ १०९ ॥

जे शस्त्रविद्येत निष्णात आहेत, मंत्रविद्येंत जे प्रत्यक्ष अवतारच वाटतात. किंबहुना सर्व अस्त्रें यांच्यापासूनच प्रचारात आली असे म्हणता येईल,

हे अप्रतिमल्ल जगीं । पुरता प्रतापु आंगीं ।
परि सर्वप्राणें मज चि लागि । आराइले ॥ ११० ॥

या जगांत हे योध्दे केवळ अजोड आहेत. यांच्या तोडीचे वीर जगात नाहीत, तरीही ते प्राणपणाने मजसाठीच युध्दाला आले आहेत.

पतिव्रतेचें हृदय जैसें । पतीवांचौनि न स्पर्शे ।
मी सर्वस्व ययां तैसें । सुभटांसि ॥ १११ ॥

पतिव्रतेचे मन जसे पतीवाचून दुसरे कशालाही शिवत नाही तसा या शूरवीरांचे सर्वस्व मीच आहे.

आमचेया काजाचेनि पाडें । देखति आपुलें जीवित थोडें ।
ऐसे निरवधि चोखडे । स्वामिभक्ती ॥ ११२ ॥

आमच्या कार्यापुढे त्यांना त्यांचे जीवितही तुच्छ वाटते. याप्रमाणे हे स्वामिनिष्ठेंत निःसीम व निर्दोष आहेत.

जूझती कुळकेणी जाणति । कळे कीर्त्तिसिं जींति ।
हें बहू असो क्षात्रवृत्ती । एथौनियां ॥ ११३ ॥

हे युध्दकलाकुशल असून युध्दकौशल्यानें कीर्तीस जिंकणारे आहेत. फार काय सांगांवें, क्षात्रनीती म्हणून जी प्रसिध्द, ती यांच्यामुळेच जगली आहे.

ऐसे सर्वैपरीं पुरते । वीर दळिं आमतें ।
आतां काइ गणूं ययांते । अपार हे ॥ ११४ ॥

याप्रमाणें आमच्या सैन्यांत सर्वतोपरी पराक्रमी असे अपार वीर आहेत, त्यांची गणना काय करू ? ते असंख्य आहेत.

अपर्याप्तं तदस्माकं बलं भीष्माभिरक्षितम् ।
पर्याप्तं त्विदमेतेषां बलं भीमाभिरक्षितम् ॥ १० ॥

अपर्याप्तम्, तत्, अस्माकम्,बलम्, भीष्म, अभिरक्षितम्
पर्याप्तम्, तु, इदम्, एतेषाम्, बलम्, भीम, अभिरक्षितम्

भीष्माचार्यांनी रक्षण केलेलें आमचें सैन्य अजिंक्य आहे. आणि भीमाने रक्षण केलेलें पांडवांचे सैन्य जिंकण्यास सोपे आहे.

वरि क्षेत्रियांमाजि श्रेष्ठु । जो जगजेठी जगीं सुभटु ।
तेया दळवैपणाचा पाटु । भिष्मासि पैं ॥ ११५ ॥

आणि त्यातही, सर्व क्षत्रियत श्रेष्ठ आणि जगांतील नाणावलेलें योद्धे असे जे भीष्माचार्य, त्यांच्याकडे सेनेचे अधिपत्य दिलेले आहे.

आतां ययाचेनि बळें गवसलें । हें दुर्ग जैसें पन्नासिलें ।
एणें मानें थेंकुलें । लोकत्रय ॥ ११६ ॥

त्यांनी हें सर्व आवरून अशा बेताने रचिलें आहे कीं, जणूं काय हे किल्लेच बांधले आहेत; याच्यापुढें त्रिभुवन देखील तुच्छ आहे.

आदि चि समुद्र काइ । तेथ दुवाडपण कवणा नाहीं ।
मग वडवानळु तैसेया ही । विरजा जैसा ॥ ११७ ॥

समुद्र पाहतां आधीच तो कोणाला दुस्तर नाहीं ? त्यातच वडवानलाचे साह्य व्हावे.

ना तरि प्रळयवन्हि महावातु । एयां दोघां जैसा सांघातु ।
तैसा हा गंगासुतु । सेनापति ॥ ११८ ॥

किंवा प्रलकाळचा अग्नी व प्रचंड वारा या दोहोंचा ज्याप्रमाणें मिलाफ व्हावा, तसा हा गंगापुत्र भीष्म आमच्या अपार सैन्याला सेनापती लाभला आहे.

आतां येणेंसीं कवण भीडे । हें पांडवसैन्य कीरु थोकडें ।
ॐइचिले अपाडें । दिसतसे ॥ ११९ ॥

तेव्हां या आमच्या सैन्याबरोबर कोण युद्ध करील ? कारण या वर्णन केलेल्या सैन्याच्या मानाने पांडवांचे सैन्य थोडेच आहे;

वरि भीमसेनु बेंथु । तो जालासे सेनानाथु ।
ऐसें बोलौनि मातु । सांडिली तेणें ॥ १२० ॥

त्यांत त्याचा सेनापति झाला आहे, तो आडदांड भीम ! असे बोलून दुर्योधनानें भाषण संपविलें.

अयनेषु च सर्वेषु यथाभागमवस्थिताः ।
भीष्ममेवाभिरक्षन्तु भवन्तः सर्व एव हि ॥ ११ ॥

आयनेषु, च, सर्वेषु, यथाभागम्, अवस्थिताः,
भीष्मम्, एव, अभिरक्षन्तु, भवन्तः, सर्वे, एव, हि

तर आता व्यूहाच्या प्रवेशद्वारांत नेमलेल्या जागीं उभे ठाकून आपण सर्वांनीं भीष्माचार्यांचे सर्व प्रकारें रक्षण करावें.

मग पुनरपि काई बोले । सकळा सैनिकांतें ह्मणितलें ।
आतां दळभार आपुलाले । सरिसे करा ॥ १२१ ॥

मग दुर्योधन सर्व सेनापतीनां पुन्हा असें म्हणाला
कीं अहो, आतां आपपले सैन्यसमुदाय सज्ज करा.

जेयां जिया अक्षौहिणी । तेणे तिया आरणीं ।
वरगण कवणा कवणीं । महारथीयां ॥ १२२ ॥

ज्याच्या हाताखाली जो जो अक्षौहिणी विभाग असेल
त्यांनी त्या सैन्यविभागाच्या आघाडीस जाऊन खडे राहावे.

तेणें तें आवरिजे । भीष्मातळिं राहिजे ।
ह्मणे द्रोणातें परिसिजे । तुह्मीं सकळीं ॥ १२३ ॥

त्या महारथ्यांनी त्या अक्षौहिणीला आपल्या हुकूमतीत ठेवावे आणि भीष्मांच्या
आज्ञेत राहावे. दुर्योधन द्रोणाचार्यांना म्हणाला, तुम्हीं सर्वांवर देखरेख करावी.

हा चि येकु रक्षावा । मी तैसा देखावा ।
एणें दळभारु आघवा । साचु आमचा ॥ १२४ ॥

आणि भीष्मांस मजप्रमाणें समजून त्यांचे रक्षण करावें;
कारण, आमच्या सर्व सैन्याची भिस्त त्यांच्यावरच आहे.

तस्य संजनयन्हर्षं कुरुवृध्दः पितामहः ।
सिंहनादं विनद्योच्चैः शकखं दध्मौ प्रतापवान् ॥ १२ ॥

तस्य, संजनयन्, हर्षम्, कुरुवृद्धा , पितामहः,
सिंहनादम्, विनद्य, उच्चैः, शङ्खं, दध्मौ, प्रतापवान्

या बोलण्यानें संतुष्ट होऊन मग दुर्योधनाचे मनास हर्ष उत्पन्न करण्याकरतां
कुरुकलांतील वृद्ध पितामह भीष्मानीं सिंहाप्रमाणें गर्जना करून शंख वाजविला.

एया रायाचेया बोला । सेनापति संतोखला ।
मग तेणें केळा । सिंहंनादु ॥ १२५ ॥

राजाच्या या भाषणानें सेनापती भीष्मांनां संतोष
झाला. मग त्यानें सिंहासारखी गर्जना केली.

तो गाजतसे अद्भुतु । तिहिं लोकांआंतु ।
प्रतिध्वनि न समातु । उपजतसे ॥ १२६ ॥

तो नाद दोन्ही सैन्यात दुमदुमून गेला; इतका
कीं त्याचा प्रतिध्वनी आंकाशांत देखील मावेना.

तेया चि तुळिगासवें । वीरवृत्तिचेनि थावें ।
दिव्य शंखु भीष्मदेवें । आस्फुरिला ॥ १२७ ॥

तो प्रतिध्वनी उठत असतांच वीरवृत्तीचे वारें
भरून भीष्मदेवानें आपला दिव्य शंख वाजविला.

ते दोन्ही नाद मीनले । तेथ त्रैलोक्य बधिर जालें ।
जैसें आकाश कां पडिलें । तूटौनियां ॥ १२८ ॥

गर्जनेचा नाद व शंखनाद एकमेकांत मिसळले आणि त्रैलोक्यात
जणू कानठळ्या बसल्या जणूं काय गगनच कडाडून खालीं कोसळलें !

घडघडीत अंबर । उचंबळत सागर ।
क्षोभलें चराचर । कांपत असे ॥ १२९ ॥

त्या वेळी गगनात गडगडाट झाला व सागराच्या लाटा मोठ्या येऊ
लागल्या. चराचर सृष्टी संत्रस्त होऊन थरथर कापू लागली.

तेणें महाघोषगजरें । दुमुदुमिति गिरिदरें ।
तंव दळामाझि रणतुरें । आस्फाळिलीं ॥ १३० ॥

त्या भयंकर नादाने पर्वताच्या गुहा दुमदुमून गेल्या, तितक्यातच त्या सैन्यांत रणवाद्यें सुरू झालीं.

ततः शङ्खाश्च भेर्यश्च पणवानकगोमुखाः ।
सहसैवाभ्यहन्यन्त स शब्दस्तुमुलोऽभवत् ॥ १३ ॥

ततः, शङ्खाः, च, भेर्यः, च, पणवानकगोमुखाः, सहसा, एव, अभ्यहन्यन्त, सः, शब्दः, तुमुलः, अभवत्

त्यानंतर अनेक शंख, नगारे, आणि ढोल, मृदुंग, गोमुख ही रण वाद्ये एकदम वाजूं लागलीं. त्यांचा आवाज फार भयंकर झाला.

उद्दंडें सैघ वाजतें । भयानकें खांखांतें ।
महाप्रळयो जेथें । धाकडांसि ॥ १३१ ॥

नानाप्रकारचीं रणवाद्ये जिकडेतिकडे इतकी भयंकर व कर्कश वाजूं लागलीं कीं, बलवंतांना देखील तो महाप्रलय वाटला

भेरी निशाण मादळ । शंख टीविला भोंगळ ।
आणि भासुर रणकोल्होळ । सुभटांचे ॥ १३२ ॥

नौबती, भेरी, निशाण, मांदळ, शंख, झांजा, तुतारी यांच्या नाद धुमाळींत पराक्रमी वीरांचे भयंकर रणघोष मिसळले.

आवेसें भुजा आत्राटिति । विसणैले हाका देंति ।
जेथ महामद भद्रजाति । धरति ना ॥ १३३ ॥

काही वीर रणमदाने भुजा थोपटत होते, कोणी एकमेकांचीं नांवें घेऊन मोठमोठ्यानें हाकां मारूं लागले. त्या ठिकाणी मदोन्मत हत्ती आवरेनासे झाले.

तेथ भेडांची कवणि मातु । काचेयां केरु फीटतु ।
जेणें दचकला कृतांतु । आंग नेघे ॥ १३४ ॥

त्या ठिकाणीं भित्र्यांची गोष्ट कशाला विचारावी ? ते तर कस्पटाप्रमाणें उडून गेलेच; पण यमास सुध्दां दहशत बसून तो इकडे तोंड देखील करीनासा झाला !

एकां उभेया चि प्राण गेले । चांगाचे दांत बैसले ।
बिरिदांचे दादुले जाले । हींवा ऐसे ॥ १३५ ॥

कोणाकोणाचे उभ्याउभ्याच प्राण गेले. चांगल्या धीरवंतांचीही दातखिळी बसली आणि जे नामांकित योद्धे होते, त्यांच्या अंगास कांपरेंसुटले !

ऐसा अद्भुतु तुरबंबाळु । आइकौनि ब्रह्मा व्याकुळु ।
देव ह्मणति प्रलयकाळु । होईल हा ॥ १३६ ॥

असा वाद्यांचा मोठा विलक्षण आवाज ऐकून ब्रह्मदेव व्याकूळ झाला; आणि स्वर्गातील देवही घाबरून प्रलयकाल आला की काय असे म्हणू लागले.

ऐसी स्वर्गीं मातु । देखौनि तो आकांतु ।
तंव पांडवदळाआंतु । काइ जालें ॥ १३७ ॥

तो आकांत पाहून स्वर्गांत अशी गोष्ट झाली. इतक्यांत इकडे पांडवांच्या सैन्यांत काय झालें ?

ततः श्वेतैर्हयैर्युक्ते महति स्यन्दने स्थितौ ।
माधवः पाण्डवश्चैव दिव्यौ शङ्खौ प्रदध्मतुः ॥ १४ ॥

ततः, श्वतैः, हयैः, युक्ते, महति, स्यन्दने, स्थितौ, माधवः, पाण्डवः, च, एव, दिव्यौ, शङ्खौ, प्रदध्मतुः

त्यानंतर पांढऱ्या शुभ्र घोड्यांनीं युक्त अशा उत्तम रथावर आरूढ
झालेले श्रीकृष्ण आणि अर्जुन यांनीहीं आपले दिव्य शंख वाजविले.

हों काज सार विजयाचें । किं तें भांडार महातेजाचें ।
जेथ गरुडाचिये जावळिचे । कांतले च्यारी ॥ १३८ ॥

जो रथ रणविजयाचें जणूं काय सारसर्वस्व, आणि महा तेजाचे
भांडारच व ज्यास गरुडाप्रमाणें वेगवान असे चार घोडे जुंपिलेले असून,

किं पाखांचा मेरु जैसा । रहवरु मिरवत तैसा ।
तेजें कोंधाटलिया दिशा । जेयाचेनि ॥ १३९ ॥

जो पक्षयुक्त मेरु पर्वताप्रमाणे दिसत होता, तो अर्जुनाचा श्रेष्ठ रथ
मिरवू लागला. त्याच्या तेजानें दाही दिशा लखलखीत दिसत होत्या.

जेथ अश्ववाहकु आपण । वैकुंठीचा राणा जाण ।
तेया रथाचे गुण । काइ वर्णूं ॥ १४० ॥

ज्या रथावर प्रत्यक्ष वैकुंठाधिपति श्रीकृष्ण सारथी
होता, त्या रथाचे गुण कोठवर वर्णन करावे ?

ध्वजेवरि वानरु । तो मूर्त्ति मंतु शंकरु ।
सारथ्यीं शार्ङ्गधरु । अर्जुनेंसी ॥ १४१ ॥

त्याच्या ध्वजस्थंभावर हनुमंत होता, तो साक्षात शंकराचाच अवतार होय,
आणि अर्जुना जवळ असलेले शार्ङ्गधर श्रीकृष्णच सारथ्याच्या कामावर होते.

देखां नवल तेया प्रभूचें । अद्भत प्रेम भक्ताचें ।
जें सारथ्य पार्थाचें । करितु असे ॥ १४२ ॥

अहो, पहा हें केवढें आश्चर्य ! त्या प्रभूचें भक्ताविषयींचें प्रेम इतकें अद्भुत आहे,
कीं तो आपला भक्त जो अर्जुन, त्याचें प्रत्यक्ष सारथ्य करीत आहे !

पांचजन्यं हृषीकेशो देवदत्तं धनञ्जयः ।
पौंड्रं दध्मौ महाशङ्खं भीमकर्मा वृकोदरः ॥ १५ ॥

पांचजन्यम्, हृषीकेशः, देवदत्तम्, धनञ्जयः,
पौंड्रम्, दध्मौ, महाशङ्खम्, भीमकर्मा, वृकोदरः

श्रीकृष्णांनीं पांचजन्य नांवाचा, अर्जुनानें देवदत्त नांवाचा व भयंकर
कर्म करण्याऱ्या भीमसेनानें पौंड्र नांवाचा शंख वाजविला.

पाइकु पाठिसिं घातला । आपण पुढां राहिला ।
तेणें पांचजन्यु आस्फुरिला । आवलीळा चि ॥ १४३ ॥

आपल्या सेवकाला पाठीशीं घालून आपण पुढें झालेल्या भगवान
श्रीकृष्णांनीं आपला पांचजन्य नांवाचा शंख सहज लीलेनें वाजविला;

परि तो महाघोषु थोरु । गाजतसे गहीरु ।
जैसा उदैला दिनकरु । लोपी नक्षत्रांतें ॥ १४४ ॥

पण या सहज फुंकलेल्या शंखाचा महाघोष फार गंभीरपणें
गाजला, सूर्योदय होताक्षणीं नक्षत्रें दिसेनाशीं व्हावीत,

तैसे तुरबंबाळ भंवते । जे कौरवदळिं गाजत होते ।
ते हारपौनि नेणों केउते । गेले तेथ ॥ १४५ ॥

कौरवांच्या सैन्यामध्यें होत असलेला वाद्यगजर
कोणीकडे लोपून गेला, त्याचा मागमूसही उरला नाही.

तैसा चि देखैं एरें । निनादें अति गहिरें ।
देवदत्तु धनुर्धरें । आस्फुरिला ॥ १४६ ॥

याचप्रमाणें अर्जुनानेंही आपला देवदत्त नांवाचा
गंभीर गर्जना करणारा असा शंख वाजविला.

ते दोन्ही शब्द अचाट । मीनले एकावट ।
तेथ ब्रह्मकटाहो शतकूट । हों पांत असे ॥ १४७ ॥

देवाचा पांचजन्य व अर्जुनाचा देवदत्त या दोन्ही शंखांचे भयंकर आवाज
जेव्हां एकत्र मिळाले, तेव्हा या ब्रह्मांडाचे आता तुकडे होणार असे वाटले.

तंव भीमसेनु विसाणैला । जैसा महाकाळु खवळला ।
तेणें पौंड्रू आत्राटिला । महाशंखु ॥ १४८ ॥

इतक्यांत खवळलेल्या कृतांताप्रमाणें आवेश चढलेल्या
भीमानें, आपला पौन्ड् नांवाचा महाशंख वाजविला.

अनन्तविजयं राजा कुन्तीपुत्रो युधिष्ठिरः ।
नकुलः सहदेवश्च सुघोषमणिपुष्पकौ. ॥ १६ ॥

अनन्तविजयम्, राजा, कुन्तीपुत्रः, युधिष्ठिरः
नकुलः, सहदेवः, च, सुघोषमणिपुष्पकौ

कुन्तिपुत्र युधिष्ठिराने आपला अनन्तविजय नावाचा शंख वाजविला आणि
नकुल, सहदेव यांनी आपले सुघोष, मणिपुष्पक या नावाचे शंख फुंकले.

तो महाप्रळइं जळधरु । तैसा घडघडिला गहिरु ।
तंव अनंतविजयो युधिष्ठिरु । आपूरिता जाला ॥ १४९ ॥

त्याचा ध्वनी प्रलयकाळच्या मेघांच्या गडगडाटाप्रमाणे फारच गंभीर
झाला. तों युधिष्ठिरानें अनन्तविजय नामक आपला शंख वाजविला.

नकुळें सुघोषु । सहदेवें मणिपुष्पकु ।
तेणें नादें अंतकु । गजबजला ॥ १५० ॥

नकुलाने सुघोष व सहदेवाने मणिपुष्पक या नावाचें शंख .
वाजविले आणि त्यांच्या नादानें प्रत्यक्ष यमही गडबडून गेला.

काश्यश्च परमेष्वासः शिखण्डी च महारथः ।
धृष्टद्युम्नो विराटश्च सात्याकिश्चापराजितः ॥ १७ ॥

काश्यः, च, परमेष्वासः, शिखण्डी, च, महारथाः,
धृष्टद्युम्नः, विराटः, च, सात्यकिः, च, अपराजितः

महाधनुर्धर काशिराज, आणि महारथी शिखंडी व
धृष्टद्युम्न, त्याचप्रमाणें विराट, व अजिंक्य सात्यकि,

द्रुपदो द्रौपदेयाश्च सर्वशः पृथिवीपते ।
सौभद्रश्च महाबाहुः शङ्खान्दध्मुः पृथक्पृथक् ॥ १८ ॥

द्रुपदः, द्रौपदेयाः, च, सर्वशः, पृथिवीपते,
सौभद्रः, च, महाबाहुः, शङ्खान्, दध्मुः, पृथक् पृथक्

द्रुपद राजा आणि द्रौपदीचे पाच पुत्र सुभद्रेचा अजानबाहूपुत्र
अभिमन्यु या सर्वांनीं हे राजा ! पृथक् पृथक् शंख वाजविले.

तेथ भूपति होते आणिक । द्रुपद द्रौपदादिक ।
हा काशीपति देख । महाबाहु ॥ १५१ ॥

त्या युध्दभूमीवर द्रुपद, द्रौपदीचे पुत्र इत्यादिक
अनेक राजे होते. महावीर काशिराजा,

एथ अर्जुनाचा सुतु । सात्यकी अपराजितु ।
धृष्टद्युम्नु नृपनाथु । शिखंडी हान ॥ १५२ ॥

अर्जुनपुत्र अभिमन्यू, अजिंक्य सात्यकी,
राजा धृष्टद्युम्न राजा, आणि शिखंडीही,

विराटादिक नृपवर । जे सैनीक मुख्य वीर ।
तिहीं नाना शंख निरंतर । आस्फुरिले ॥ १५३ ॥

त्याचप्रमाणे विराट व इतर मोठमोठे राजे व सेनेतील मुख्य वीर
तेथे होते तेही आपापले निरनिराळे शंख सतत वाजवू लागले.

स घोषो धार्तराष्ट्राणां हृदयानि व्यदारयत् ।
नभश्च पृथिवीं चैव तुमुलो व्यनुनादयन् ॥ १९ ॥

सः, घोषः, धार्तराष्ट्राणाम् हृदयानि, व्यदारयत्
नभः, च, पृथिवीम् च, एव, तुमूलः, व्यनुनादयन्

त्या भयंकर शंखनादाने आकाशाला व पृथ्वीला ही दणाणून
सोडून त्या धृतराष्ट्राच्यापुत्रांची हृदये विदीर्ण केलीं.

तेणें महाघोषनिर्धातें । शेष कूर्म अवचिते ।
गजबजौनि भारातें । सांडूं पांति ॥ १५४ ॥

त्या शखांच्या महाध्वनीनें शेष व कूर्म हे एकदम दचकले आणि घाबरून
पृथ्वीचा आपल्या मस्तकावरील भार टाकून द्यायला उद्युक्त झाले;

तेथ तीन्ही लोक डंडळित । मेरुमंदार आंदोळत ।
समुद्रजळ उसळत । आकाशवेर्‍हीं ॥ १५५ ॥

त्या योगानें त्रैलोक्य डळमळू लागले. मेरु व मंदार हे डोलूं लागले. आणि
समुद्राच्या एवढ्या प्रचंड लाटा उठल्या की त्या कैलास पर्वतापर्यंत पोचल्या.

पृथिवीतळ उलंडों पांत । आकाश असे अडदरत ।
तेथ रासौभा होंत । नक्षत्रांचा ॥ १५६ ॥

पृथ्वी पालथी होते कीं काय व आकाश कोसळून पडतें
कीं काय असें वाटूं लागलें, नक्षत्रांचा पृथ्वीवर सडा पडला.

गेली रे सृष्टि गेली । देवां मोकळवादि जाली ।
ऐसी एकताळी पीटली । सत्यलोकिं ॥ १५७ ॥

अरे ! सृष्टी बुडाली, देवांचा त्राता कोणी नाही
अशी सत्यलोकांत एकच हाकाटी उठली.

दिहा चि दीनु थोंकला । जैसा प्रळयदीपु माल्हवला ।
तेथ हाहाकारु उठिला । तिहीं लोकिं ॥ १५८ ॥

दिवस असतानांच सूर्य नाहींसा झाला, आणि जसा काय
प्रलयकाळ ओढवल्या मुळें त्रिभुवनांत हाहाकार उडाला.

तंव आदिपुरुखु विस्मितु । ह्मणें झनें होये अंतु ।
मग लोपिला अद्भुतु । संभ्रमु तो ॥ १५९ ॥

तेव्हां आदिपुरुष जे श्रीकृष्ण, त्यांना आतां विश्वाचा खरोखर
अन्त होईल असें जाणून त्यांनीं तो अद्‌भूत शंखनाद बंद केला,

ह्मणौनि विश्व संवरलें । यव्हविं युगांत होतें ॐडवलें ।
जेथ महाशंख आपूरिले । कृष्णादिकीं ॥ १६० ॥

त्यामुळे जग सावरलें. नाहींतरं, ज्या वेळेला कृष्णादिकांनीं आपले
दिव्य शखं वाजविले, त्या वेळीं प्रलयकाळ होण्याची वेळ आली होती,

तो घोषु तरि उपसंहरलां । परि पडिसादा होउनि राहिला ।
तेणें दळभारु विध्वंसिला । कौरवांचा ॥ १६१ ॥

तो शखंनाद बंद झाला तथापि त्याचा जो प्रतिध्वनि
घुमत होता, त्या योगानें कौरव सैन्याची दाणादाण झाली.

जैसा सींहु गजघटाआंतु । संचरे लीळा विदारतु ।
तैसा हृदयातें भेदितु । वीरांचेयां ॥ १६२ ॥

ज्याप्रमाणे हत्तीच्या समुदायांचा सिंह लीलेने नाश करतो त्या
प्रमाणे तो पडसाद कौरवांच्या हृदयाचा थरकाप उडवीत राहीला.

तो गाजत जंव आइकति । तंव उभेयां चि हियें घालिति ।
एक एकातें ह्मणति । सावध रे ॥ १६३ ॥

तो आवाज ऐकून कित्येक खडे सैनिक हिम्मत सोडून गलितगात्र झाले
आणि ते एकमेकांना सावध रे सावध ! म्हणूंन आरोळी देऊं लागले.

अथ व्यवस्थितान्दृष्ट्वा धार्तराष्ट्रान्कपिध्वजः ।
प्रवृत्ते शस्त्रसम्पाते धनुरुद्यम्य पाण्डवः ॥ २० ॥

अथ, व्यवस्थितान्, दृष्ट्वा, धार्तराष्ट्रान्, कपिध्वजः
प्रवृत्ते, शस्त्रसम्पाते, धनुः, उद्यम्य, पाण्डवः

ज्याच्या ध्वजस्तंभावर मारुती आहे अशा अर्जुनानें युध्दाकरीतां
कौरवपक्षीय सैनिक व्यवस्थित उभे राहिलेले पाहून आपले धनुष्य उचलिलें.

तेथ बळें प्रौढी पुरते । जे महारथी वीर होते ।
तिहीं पुनरपि दळातें । आवरिलें ॥ १६४ ॥

त्या सैन्यात पराक्रमाने व मोठेपणानें जे पुरे शूर
महारथी होते त्यांनी आपापल्या सैन्याला पुनः धीर दिला,

मग सरिसेपणें उठावले । दुणावटौनि उचलले ।
तेया दंडी क्षोभलें । लोकत्रय ॥ १६५ ॥

मग ते मोठ्या तयारीनें पुढें सरसावले, व त्यांनी दुप्पट आवेशानें
उठाव केला. उसळलेल्या त्या सैन्यामुळें तिन्ही लोक क्षुब्ध झाले.

तेथ बाणवारि धनुर्धर । वरिषताति निरंतर ।
जैसे प्रळयांतीं जळधर । अनिवार कां ॥ १६६ ॥

त्या धनुर्धारी वीरांनीं बाणांची इतकी भयंकर वृष्टी केली
कीं, जणू काय प्रलयकालची पर्जन्यवृष्टि होत आहे !

तें देखलेयां अर्जुनें । संतोखु घेउनि मनें ।
मग संभ्रमें सैन्यें । अवलोकित असे ॥ १६७ ॥

अर्जुनानें तें पाहून मनात संतोष मानला,
आणि मग उत्सुकतेनें सैन्याकडे नजर टाकली.

तंव संग्रामीं सज्ज जालें । सकळ कौरव देखिले ।
मग लीळा धनुष्य उचलिलें । पांडुकुमरें ॥ १६८ ॥

तेव्हां त्याच्या दृष्टीस युद्धाला सज्ज झालेले सर्व कौरव पडले,
मग त्या पंडुकुमरानें सहज लीलेनें आपलें धनुष्य पेललें.

अर्जुन उवाच - हृषीकेशं तदा वाक्यमिदमाह महीपते ! ।
सेनयोरुभयोर्मध्ये रथं स्थापय मेऽच्युत ! ॥ २१ ॥

हृषीकेशम्, तदा, वाक्यम्, इदम्, आह, महीपते,
सेनयोः उभयोः, मध्ये, रथम्, स्थापय, मे, अच्युत

त्या वेळेस राजा, अर्जुन श्रीकृष्णास म्हणाला, देवा, आतां आपला
रथ लौकर नेऊन दोन्ही सैन्यांच्या मध्यभागीं नेऊन उभा करा.

तेव्हळिं ह्मणतसे देवा । आतां झडकरि रथु पेलावा ।
नेउनि मध्यें घालावा । दोहीं दळा ॥ १६९ ॥

मग त्या वेळीं अर्जुन श्रीकृष्णास म्हणाला देवा! आतां
रथ लौकर चालवून दोन्ही सैन्यांच्या मध्ये न्यावा,

यावदेतान्निरीक्षेऽहं योद्धुकामानवस्थितान् ।
कैर्मया सह योद्धव्यमस्मिन्रणसमुद्यमे ॥ २२ ॥

यावत्, एतान्, निरीक्षे, अहम्, योद्धुकामान्, अवस्थितान्,
कैः, मया, सह, योद्धव्यम्, अस्मिन्, रणसमुद्यमे

येथे युद्धाच्या इच्छेने आलेल्या सर्वांस मी ह्या रणामध्यें
मी कोणा बरोबर युध्द करावें हे मी पाहू इच्छितो.

जंव मीं नाव येक । हे सकळै वीर सैनिक ।
निहाळीन अशेख । जुझते जे ॥ १७० ॥

म्हणजे हे जे लढायला आलेले सर्व शूरवीर सैनिक
आहेत ते सगळे एकदा नीट पाहून घेईन.

एथ आले असति आघवे । परि मियां कवणेंसीं जुझावें ।
हें रणीं लागे पहावें । ह्मणौनियां ॥ १७१ ॥

कारण येथें जरी सर्व वीर जमले आहेत, तरी मी
कोणाशी युद्ध करावयाचें आहे हे पाहिले पाहिजे.

योत्स्यमानानवेक्षेऽहं य एतेऽत्र समागताः ।
धार्तराष्ट्रस्य दुर्बुद्धेर्युद्धे प्रियचिकीर्षवः ॥ २३ ॥

योत्स्यमानान्, अवेक्षे, अहम्, य, एते, अत्र, समागताः
धार्तराष्ट्रस्य, दुर्बुद्धेः, युद्धे, प्रियचिकीर्षवः

दुष्टबुद्धि दुर्योधनाचें युद्धामध्यें प्रिय करण्याची इच्छा असलेले जे जे
हे राजे लोक या ठिकाणीं आले आहेत त्या लढणाऱ्यानां मीं पाहतो.

बहुतकरुनि कौरव । हे आतुर दुःस्वभाव ।
वांठिवांविण हांव । बांधति जुझीं ॥ १७२ ॥

कारण हे कौरव बहुतेक सगळेच योग्यता नसूनही
लढाई करण्याची खुमखुमी बाळगून आहेत,

जुझाची आवडि धरति । परि संग्रामीं थीर न्हवति ।
हें सांघौनि रायाप्रति । काइ संजयो ह्मणे ॥ १७३ ॥

यांना युध्दाची हौस आहे, पण युध्दाला आवश्यक असणारें धैर्य मात्र यांचे
अंगी नाहीं. अर्जुनाचें हें असें बोलणे धृतराष्ट्रास सांगून संजय म्हणांला,

सञ्जय उवाच -
एवमुको हृषीकशो गुडाकेशेन भारत ।
सेनयोरुभयोर्मध्ये स्थापयित्वा रथोत्तमम् ॥ २४ ॥

एवम्, उक्तः, हृषीककशः, गुडाककशेन्,भारत,
सेनयोः, उभयोः, मध्ये, स्थापयित्वा, रथोत्तमम्

संजय म्हणतो राजा ! अर्जुनाने असे म्हणतांच भगवान्
श्रीकृष्णाने दोन्ही सैन्यांच्या मध्यभागीं रथ नेऊन उभा केला.

आइका अर्जुनु इतुकें बोलिला । तंव कृष्णें रथु पेलिला ।
दोहों सैन्यामाझि केला । उभा तेणें ॥ १७४ ॥

राजा, ऐक, असें, अर्जुन बोलला मात्र, तोंच श्रीकृष्णांनीं
रथ दोन्ही सैन्यांच्या मध्यें नेऊन उभा केला.

भीष्मद्रोणप्रमुखतः सर्वेषां च महीक्षिताम् ।
उवाच पार्थ पश्यैतान्समवेतान्कुरूनिति ॥ २५ ॥

भीष्मद्रोणप्रमुखतः, सर्वेषाम्, च, महीक्षिताम्
उवाच, पार्थ, पश्य, एतान्, समवेतान्, कुरून्, इति

भीष्म, द्रोण आणि इतर सर्व राजे पाहत असता भगवान्
अर्जुनाला म्हणाले जमलेल्या या कौरवाांना पहां

जेथ भीष्मद्रोणादिक । जवळिके चि संमुख ।
पृथिवीपति आणिक । बहुत अहाति ॥ १७५ ॥

ज्या ठिकाणीं भीष्म द्रोण आदिकरून
आप्तसंबंधी व आणखी पुष्कळ राजे उभे होते.

तेथ थीरु करुनि रथु । अर्जुन असे पांतु ।
तो दळभारु समस्तु । संभ्रमेंसीं ॥ १७६ ॥

त्या ठिकाणीं रथ थांबवून अर्जुन तो सर्व
सैन्य समुदाय उत्सुकतेनें पाहू लागला,

मग ह्मणे देख देख । हे गोत्रगुरु अशेष ।
तंव कृष्णा मनीं नावेक । विस्मो जाला ॥ १७७ ॥

मग म्हणला. देवा! पहा, पहा हे तर सर्व आमचे आप्तवर्ग
व गुरु आहेत. हे ऐकून श्रीकृष्णांस क्षणभर आश्चर्य वाटलें.

तो आपणपेंया आपण ह्मणे । एथ काइ कवण जाणे ।
हें मनीं धरिलें एणें । परि कांहीं असे ॥ १७८ ॥

ते आपल्या मनांत म्हणतात, अर्जुनाने हे काय मनांत आणले
कोण जाणे परंतु हा कांहीं तरी चमत्कारिक प्रकार आहे.

ऐसी पुढील से घेतु । तो साहाजें जाणे हृदयस्थु ।
परि उगा चि असे निवांतु । तिये वेळे ॥ १७९ ॥

ते दुसऱ्याचें मनोगत सहज जाणणारे असल्यामुळें त्यांनीं पुढील भविष्य जाणलें,
पण काही न बोलता, कार्यनाश न व्हावा म्हणून त्यानी मौनच सांभाळले.

तत्रापश्यत्स्थितान्पार्थः पितॄनथ पितामहान् ।
आचार्यान्मातुलान्भ्रातॄन्पुत्रान्पौत्रान्सखींस्तथा ॥ २६ ॥

तत्र, अपश्यत्, स्थितान् पार्थः, पितॄन्, अथ, पितामहान्,
आचार्यान्, मातुलान् भ्रातन्, पुत्रान् पौत्रान् सखीन्, तथा

तेव्हां अर्जुनानें, वडील, आजे, गुरु, मामे, भाऊ, मुलगे, नातू, मित्र
सासरे व आपले हितकर्ते दोन्ही सैन्यांत उभे आहेत असें पाहिले.

तंव तेथ पार्थु सकळ । पितृ पितामह केवळ ।
गुरु बंधु मातुळ । देखता जाला ॥ १८० ॥

तों तेथें केवळ आपले चुलतें, आजे, गुरु,
भाऊ, मामा या सर्वांसच अर्जुनानें पाहिलें.

इष्ट मित्र आपुले । कुमर हान देखिले ।
शालक असति आले । तेयामाझि ॥ १८१ ॥

आपले इष्टमित्र, त्याप्रमाणेंच आपल्या कुळांतील तरुण
मुलगेही, त्यानें पाहिले. या मंडळींत त्याचे मेव्हणेही दिसले.

श्वशुरान्सुहृदश्चैव सेनयोरुभयोरपि ।
तान्समीक्ष्य स कौन्तेयः सर्वान्बन्धूनवस्थितान् ॥ २७ ॥

श्वशुरान्, सुहृदः. च, एव, सेनेयोः, उभयोः, अपि
तान्, समीक्ष्य, सः, कौन्तेयः, सर्वान्, बन्धून्, अवस्थितान्

त्या उभे असलेल्या सर्व बांधवांना पाहून तो अत्यंत करुणेनें
व्याकुल झालेला कुन्तीपुत्र अर्जुन विषाद पावून असें बोलूं लागला.

सुहृद हान ससुरे । आणिक ही सखे सोयरे ।
कुमर पौत्र धनुर्धरें । देखिले तेथ ॥ १८२ ॥

जिव्हाळ्याचे स्नेही, सासरे, दुसरे सगेसोयरे,
मुलगे, व नातूही, अर्जुनाला त्या गर्दींत दिसले.

जेयां उपकार होंते केले । जे आपदीं होंते रक्षिले ।
हें असो वडिल धाकुले । आदिकरुनि ॥ १८३ ॥

ज्यांच्यावरआपण उपकार केले किंवा ज्यांना आपण संकटात
वाचविलें, असेच नव्हत तर वडिल धाकटे, इत्यदि सर्वच तेथे होते.

ऐसें गोत्र चि दोहीं दळीं । उद्यत जालें असे कळीं ।
तें अर्जुनें तिये काळीं । अवलोकिलें ॥ १८४ ॥

असें हें सर्व कुळच दोन्ही सैन्यांत लढाईस तयार
झालेलें आहे, हें त्या वेळीं अर्जुनानें पाहिलें.

अर्जुन उवाच ः-कृपया परयाऽविष्टो विषीदन्निदमब्रवीत्. ।
दृष्ट्वेमं स्वजनं कृष्ण युयुत्सुम् समुपस्थितम् ॥ २८ ॥

कृपया, परया, आविष्टः, विषीदन्, इदम् अब्रवीत्
दृष्ट्वा, इमम्, स्वजनम्, कृष्ण, युयुत्सुम्, समुपस्थितम्

त्या उभे असलेल्या सर्व बांधवांना पाहून तो अत्यंत करुणेनें
व्याकुल झालेला कुन्तीपुत्र अर्जुन विषाद पावून असें बोलूं लागला

एथ मनीं गजबज जाली । आपैसी कृपा आली ।
तेणें अपमानें निगाली । वीरवृत्ति ॥ १८५ ॥

त्या वळीं त्याचें मन बावरून जाऊन त्यास अपोआप करुणा उत्पन्न
झाली व त्या अपमानामुळें अर्जुनाच्या अंगांतील वीरवृत्ति निघून गेली.

जिये उत्तमे कुळिचिया होंति । आणि गुणलावण्यें आथि ।
तिया आणिकीतें न साहाति । सुतेजपणें ॥ १८६ ॥

नविये आवडिाचेनि भरें । कामिकु निजवनिता विसरे ।
मग पाडेंविण अनुसरे । भ्रमला जैसा ॥ १८७ ॥

कां तपोबळें रिद्धि । पातलेया भ्रंशु बुद्धी ।
मग विरगता सिद्धि । आठवेना ॥ १८८ ॥

तैसें अर्जुना तेथ जालें । जें असतें पौरुष धाडिलें ।
जें अंतष्करण दीन्हलें । कारुण्यासि ॥ १८९ ॥

देखां मंत्रज्ञु बरळु जाये । तेथ कां जैसा संचारु होये ।
तैसा तो धनुर्धरु महामोहें । आकळिला ॥ १९० ॥

ह्मणौनि असता धीरु गेला । हृदयासि द्राॐ आला ।
जैसा चंद्रकळा सीतला । सोमकांतु ॥ १९१ ॥

तियापरीं पार्थु । अतिस्नेहें मोहितु ।
मग सखेदु असे बोलतु । अच्युतेंसीं ॥ १९२ ॥

तो ह्मणे अवधारीं देवा । मियां पाहिला हा मेळावा ।
तंव गोत्रवर्गु आघवा । देखिला एथ ॥ १९३ ॥

हे संग्रामीं अतिउदित । जाले असति कीरु समस्त ।
परि आपणयां उचित । केवि होये ॥ १९४ ॥

येणें नावें चि नेणों काइ । मज आपणपें सर्वथा नाहीं ।
मनो बुद्धि ठांइ । थीरु न्हवे ॥ १९५ ॥

ज्या स्त्रिया उच्च कुळांतल्या असून गुण व रूप यांनीं संपन्न असतात,
त्यांना आपल्या सतेजपणामुळें, दुसऱ्या स्त्रियांचें वर्चस्व सहन होत नाहीं.

ज्याप्रमाणें नवीन स्त्रीच्या आवडीचे भरांत विषयी पुरुष आपल्या स्त्रीस विसरून
भ्रम झालेल्या मनुष्याप्रमाणें या नवीन स्त्रीच्या नादी वेड्यासारखा लागतो;

किंवा तपाच्या सामर्थ्यानें वैभवाची भरभराट झाली असतां जशी बुद्धी
फिरते मग पहिल्या विरक्त स्थितीची त्याला आठवणही राहत नाही.

त्याप्रमाणें अर्जुनानें आपल्या अंतःकरणात करुणेस थारा दिल्यामुळें
त्याच्या अंगचा स्वाभाविक पराक्रमीपणा, पौरुष, नाहीसे झाले,

अहो, जसा मांत्रिकानें मत्रोच्चारांत प्रमाद करावा, आणि मग त्यालाच
उलट भूत झपाडते तसा तो धनुर्धारी अर्जुन मोठ्या मोहानें व्यापला गेला.

त्यामुळे अंगी सहजच असलेलें धैर्य हारपलें. त्याचे हृदय द्रवूं लागलें.
ज्याप्रमाणे चंद्रकिरणांचा वर्षाव झाल्यानें चंद्रकान्तमणि पाझरू लागतो,

त्याप्रमाणें तो करुणेनें अतिमोहित झाला, व मग
खेदयुक्त अंतःकरणानें श्रीकृष्णांशीं बोलूं लागला.

अर्जुन म्हणला, देवा ऐका. मी हा सर्व जमाव
पाहिला, तों येथें तर सर्व आप्तसंबंधीच दिसतात.

आणि हे सर्व युद्ध करण्याच्या इच्छेने उद्युक्त झाले आहेत
खरे पण यांच्याशीं लढणें आपल्याला कसें योग्य दिसेल ?

या विचारानें मला कांहीं सुचत नसून माझें मलाच भान
नाहींसे झाले आहे, मन आणि बुद्धी स्थिरच राहत नाही !

सीदन्ति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति. ।
वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जायते. ॥ २९ ॥

सीदन्ति, मम, गात्राणि, मुखम्, च, परिशुष्यति,
वेपथुः, च, शरीरे, मे, रोमहर्षः, च, जायते

माझे गात्रे शिथिल झाली आहेत, तोंडाचे पाणी पळाले आहे, माझ्या
अंगास कंप सुटला आहे. आणि सारें शरीर रोमांचीत झालें आहे.

गाण्डीवं स्त्रंसते हस्तात्त्वक्चैव परिदह्यते. ।
न च शक्नोम्यवस्थातुं भ्रमतीव च मे मनः ॥ ३० ॥

गाण्डीवम्, स्त्रंसते, हस्तात्, त्वक्, च, एव, परिदह्यते,
न, च, शक्नोमि, अवस्थातुम् भ्रमति, इच, च, मे, मनः

हातांतून गांडीव धनुष्य गळून पडत आहे. शरीराच्या त्वचेचा दाह होत
आहे; मी उभा राहण्याला समर्थ नाहीं. माझें मन जणूं भ्रमण पावत आहे.

देखैं देह कांपत । तोंड असे कारडें होंत ।
विकळता उपजत । गात्रांसि ॥ १९६ ॥

पहाना ! माझें शरीर थरथरत आहे, तोंडाला कोरड पडली
आहे, आणि सर्व अवयव विकल व्हावेत, असे गळून गेले आहेत.

सर्वांगा कांटाळा आला । अतिसंतापु उपनला ।
तेणें विव्हळु हातु गेला । गांडिवाचा ॥ १९७ ॥

सर्वांगावर काटा उभा राहिला आहे, मन अती संतप्त झाले आहे.
ज्या हातीं गांडीव धनुष्य धरावें, तोच मुळीं लुळा पडला आहे.

तें न धरत निसुटलें । परि नेणे चि हातौनि पडिलें ।
ऐसें हृदय असे व्यापलें । मोहें तेणें ॥ १९८ ॥

हें गांडीव ढिलें होऊन निसटलेंः पण तें हातांतून गळलें, हेंही मला
समजले नाहीं, इतकें माझें हृदय या मोहानें ग्रस्त झालें आहे !

जें वज्रापासौनि कठिन । दुर्द्धर अतिदारुण ।
तेयाहीहूनि असाधारण । हें स्नेह नवल ॥ १९९ ॥

माझें अंतःकरण वज्रापेक्षांही कठिण असून दुसऱ्यास दाद न देणारें त्यापेक्षाही
हा स्वजनांचा मोह निवृत्त होण्याला अत्यंत कठीण आहे हे आश्चर्य आहे.

जेणें शंकरु रणीं जींतिला । कृतांतु आंकणा घातला ।
तो अर्जुनु मोहें कवळिला । क्षणामाझि ॥ २०० ॥

ज्यानें युद्धामध्ये प्रत्यक्ष शंकरावर विजय मिळविला, ज्यानें निवांतकवच नामक
असुरांचें निर्मूळ करून टाकिलें. त्या अर्जुनाला एका क्षणांत मोहाने घेरले !

जैसें भ्रमरु तरि भेदी कोडें । भलतैसें काष्ट कोरडें ।
परि कळिकेमाझि सांपडे । कोवळिये ॥ २०१ ॥

भ्रमर हवें तसलें कोरडें लाकूड अगदीं सहज कोरतो, पण तोच
कमळाच्या कोमल कलिकेत, ती मिटताच अडकून पडतो.

तेथ उत्तीर्ण होये प्राणें । परि तें कमळदळ चीरूं नेणे ।
ऐसें कठिन कोवळेपणें । स्नेह देखां ॥ २०२ ॥

तिथें एका परता तो प्राण गमावील, पण ते कमळदल चिरून बाहेर येणें
त्याला जमत नाही; त्याप्रमाणें आप्तांची ममता तोडण्यास कठिण आहे.

हे आदिपुरुषाची माया । ब्रह्मेयाहीं नैये चि आया ।
ह्मणौनि भुलविला आइकैं राया । संजयो ह्मणे ॥ २०३ ॥

संजय म्हणाला, राजा ऐक, ही आदिपुरुषाची माया प्रत्यक्ष
ब्रह्मदेवालाही अजेय आहे ! म्हणूनच अर्जुन असा मोहित झाला.

अवधारीं मग तो अर्जुनु । देखौनि सकळु स्वजनु ।
विसरला अभिमानु । संग्रामिचा ॥ २०४ ॥

राजा, अशा प्रकारे समोर युध्दासाठी आपलेच नातलग आलेले
पाहून मग तो अर्जुन संग्रामींचा पुरुषार्थ अगदींच विसरला.

कैसी नेणों सदयता । उपनली असे चित्ता ।
मग ह्मणे कृष्णा आतां । नसिजे एथ ॥ २०५ ॥

त्याच्या मनांत हा दयेचा संचार कसा झाला, हें कांहीं सांगतां येत नाहीं.
मग तो कृष्णाला म्हणाला, देवा ! आता आपण येथे राहू नये असे वाटते.

माझें अतिशयें मन व्याकुळ । होंतसे वाचा बरळ ।
जें वधावे हे सकळ । एणें नावें ॥ २०६ ॥

हे सर्व स्वजन मारावे असे मनात आले की माझे मन
अत्यंत व्याकुळ होते व तोंडातून शब्दही फुटत नाही.

निमित्तानि च पश्यामि विपरीतानि केशव ! ।
न च श्रेयोऽनुपश्यामि हत्वा स्वजनमाहवे ॥ ३१ ॥

नमित्तानि, च, पश्यामि, विपरीतानि, केशव,
न, च, श्रेयः, अनुपश्यामि, हत्वा, स्वजनम्, आहवे

हे केशवा, मला सगळीं लक्षणे विपरीत दिसत आहेत व युध्दामध्यें
स्वजनांचा घात केला असतां पुरुषार्थ होईल असे मला वाटत नाही.

एयां कौरवा वरिवांवें । तरि युधिष्ठिरादिक कां नेघावे ।
हे येरयेरै आघवे । गोत्र आमुचें ॥ २०७ ॥

या कौरवांचा वध करणें योग्य आहे, तर मग युधिष्ठिर
आदिकांना कां मारूनये ? कारण दोघेही आमचे आप्तच आहेत.

ह्मणौनि जळो हें जूझ । प्रत्यया नैये मज ।
एणें काइ काज । महापापें ॥ २०८ ॥

म्हणून, देवा ! जळो हे युद्धः मला कांहीं तें पसंत
पडत नाही. या महापापाने काय लाभ होणार !

देवा बहुतीं परीं पांतां । एथ उॅंखटें होईल जूझतां ।
वर काहीं एक चुकवितां । लाभु आथि ॥ २०९ ॥

देवा ! अनेक दृष्टीनीं विचार केला असतां मला वाटते युद्ध करण्यात
आपले हित नाही. आणि तें जर टाळलें तर कांहीं लाभ होईल

न काङ्क्षे विजयं कृष्ण न च राज्यं सुखानि च. ।
किं नो राज्येन गोविन्द किं भोगैर्जीवितेन वा ॥ ३२ ॥

न, काङ्क्षे, विजयम्, कृष्ण, न, च, राज्यम् सुखानि, च
किम्, नः, राज्येन, गोविन्द, किम्, भोगैः, जीवितेन, वा

मला जयाची इच्छा नाही, तशीच राज्य व राजसुखाची इच्छा नाही. हे गोविंदा ! आम्हांला राज्य
घेऊन काय करावयाचें ? तसेंच उपभोग तरी कशाला पाहिजेत ? आणि जगून तरी काय करायचें ?

तिया विजय वृत्ती काहीं । मज सर्वथा काज नाहीं ।
एथ राज्य तरि काइ । हें पाउनियां ॥ २१० ॥

त्या विजयाच्या इच्छेशीं मला कांहीच कर्तव्य नाहीं;
आणि असे मिळविलेले राज्य तरी काय करायचे आहे ?

येषामर्थे काङ्क्षितं नो राज्यं भोगाः सुखानि च ।	येषाम्, अर्थे, कांक्षितम्, नः, राज्यम्, भोगाः, सुखानि, च
त इमेऽवस्थिता युद्धे प्राणांस्त्यक्त्वा धनानि च ॥ ३३ ॥	ते, इमे, अवस्थिताः युद्धे, प्राणान् त्यक्त्वा, धनानि, च

ज्यांच्याकरिता आम्ही राज्य भोग व सुख यांची इच्छा करायची, ते हे
सगळे धनाची आणि प्राणांची आशा सोडून युद्धाला उभे राहिले आहेत.

एयां सकळांतें वधावे । मग जे भोग भोगावे । जळतु ते आघवे । पार्थु ह्मणे ॥ २११ ॥	अर्जुन म्हणतो, या सर्व स्वजनांना मारून जर राज्यभोग भोगायचे तर त्या राज्यभोगाला आग लागो.
तेणें सुखेंविण जें होइल । तें भलेतें वर साहिजैल । वरि जीवित ही शेषीं जाइल । एथ देवा ॥ २१२ ॥	जो प्रसंग येऊन पडेल, तो वाटेल तसा बिकट असला तरीही सहन करून घेतां येईल. इतकेंच काय ? हें साधण्यासाठीं प्राण वेंचावा लागला, तरीही पत्करेल.
परि यांसि घातु कीजे । मग आपण राज्य भोगिजे । हें स्वप्नीं ही मन माझें । करूं न शके ॥ २१३ ॥	परंतु यांचा वध करावा, आणि मग आपण राज्यसुख भोगावे, ही गोष्ट माझ्या स्वप्नांतही येणार नाही.
तरि आह्मीं कां जन्मावें । कवणालागि जियावें । जें वडिलां येया चिंतावें । विरु मनीं ॥ २१४ ॥	जर या वडील माणसांचे अहित मनानें चिंतावयाचे, तर आम्हीं जन्मावे तरी कशाला ? व जिवंत राहावे तरी कशाकरीता ?
पुत्रातें इछी कुळ । तेयाचें काइ हें चि फळ । जें निर्दळिजे केवळ । गोत्र आपुलें ॥ २१५ ॥	कुळतील पुरुष, पुत्र व्हावा अशी इच्छा करतात, पुत्र झाल्यावर त्याने आपल्या गोतकुळाचा फडशा पाडावा हेच इच्छेचे फळ काय ?
हें मनीं चि केवि धरिजे । आपण वज्राचेयां बोलिजे । वर घडे तरि कीजे । भलें एयां ॥ २१६ ॥	आपण आपलें मन वज्राप्रमाणे कठोर करावे हे असें मनात तरी कसें आणावें ? झाल्यास आपण त्यांचे हितच करावें.
आह्मीं जें जें जोडावें । तें समस्तीं इहीं भोगावें । हें जिवित ही उपकरावें । काजीं यांचां ॥ २१७ ॥	आम्हीं जें जें संपादन करावें तें तें सर्व यांनीं भोगावें, किंबहुना यांच्या कार्याकतिां, आम्हीं स्वतःचे जिवितही भरीस घालावें.
आह्मीं दिगंतिचे भूपाळ । विभांडूनि सकळ । संतोषविजे कुळ । आपुलें जें ॥ २१८ ॥	आम्ही देशोदेशींचे राजांना जिंकून त्यांची संपत्ती लुटून आणावी व आपल्या कुळाला सुख द्यावे.
ते चि हे समस्त । परि कैसें कर्म विपरीत । जें जाले असती उद्यत । जूझावेया ॥ २१९ ॥	तेंच हे आमचे सर्व कुळ; पण कर्म कसें विपरीत आहे पहा ! तेच सगळे झुंजण्यासाठीं उभे ठाकले आहेत !

आंतौरिया कुमरें । सांडूनिया भांडारें ।
शस्त्राग्रीं जिव्हारें । आरोपुनि ॥ २२० ॥

बायका, मुले आपले खजिने हे सर्व सोडून व तरवारीच्या धारेवर ज्यांनीं ज्यांनीं आपले जीव ठेविले आहेत,

ऐसेयांते कैसेनि मारूं । कवणावरि शस्त्र धरुं ।
निजहृदया करुं । घाव केंवि ॥ २२१ ॥

अशांना कसे मारायचे व यांच्यावर शस्त्र तरी उचलता येईल का ? कोणावरही शस्त्र धरावे तरी आपल्याच हृदयावर घाव घालण्यासारखे ते होणार !

आचार्याः पितरः पुत्रास्तथैव च पितामहाः ।
मातुलाः श्वशुराः पौत्राः श्यालाः सम्बन्धिनस्तथा ॥ ३४ ॥

आचार्याः पितरः, पुत्राः तथा, एव, च, पितामहाः
मातुलाः, श्वशुराः,पौत्राः, श्यालाः, सम्बन्धिनः, तथा

गुरुजन, वडिल, पुत्र, त्याचप्रमाणे आजे, मामे, सासरे, नातू, मेव्हणे, तसेच सोयरे वगैरे येथे आले आहेत.

हे नेणिसि तूं कवण । तरि पैल पैं भीष्मद्रोण ।
जेयांचे उपकार असाधारण । आह्मां बहुत ॥ २२२ ॥

हे कोण आहेत, तूं जाणत नाहीस काय ? यांचे आमच्यावर अत्यंत उपकार आहेत ते भीष्माचार्य व द्रोणाचार्य हे पलिकडे आहेत, पहा.

एथ शालक ससुरे मातुळ । आणि बंधु किर हे सकळ ।
पुत्र नातू केवळ । इष्ट असति ॥ २२३ ॥

इथें हे मेहुणे, सासरे, मामे आणि सगळे बंधुबांधव, पुत्र, नातू आणि हे केवळ आम्हांस अतिशय इष्ट असणारेही आहेत.

अवधारीं अति जवळिकेचे । हे सकळ ही सोइरे आमचे ।
ह्मणौनि दोषु आथि वाचे । एणें नावें ॥ २२४ ॥

हे सर्व आमचे अगदी जवळचे सगेसोयरे आहेत. म्हणून त्यांचा युद्धात वध करण्याची भाषा जरी केली तरी देखील मोठा दोष लागेल.

एतान्न हन्तुमिच्छामि घ्नतोऽपि मधुसूदन ! ।
अपि त्रैलोक्यराज्यस्य हेतोः किं नु महीकृते ॥ ३५ ॥

एतान्, न, हन्तुम्, इच्छामि, घ्नतः, अपि, मधुसूदन
अपि, त्रैलोक्यराज्यस्य, हेतोः, किम्, नु, महीकृते

हे मधुसूदना, जरी यांनी माझा वध केला, तरी मी त्रैलोक्याच्या राज्य सुखाकरितां या सर्वांना मारूं इच्छित नाहीं, मग पृथ्वीची काय कथा ?

हे वर भलेतें करितु । आतां चि एथ मारितु ।
परि आपण मनें घातु । न चिंतावा ॥ २२५ ॥

उलटपक्षीं, हे वाटेल तें करोत, आतांच पाहिजे तर आम्हांस येथें मारोत, पण आपण मात्र यांना मारण्याचा विचार मनात आणू नये.

त्रैलोकिचें अनकळित । जऱ्हीं राज्य जोडैल एथ ।
तऱ्हीं हें अनुचित । नाचरें मीं ॥ २२६ ॥

त्रैलाक्याचें निष्कंटक राज्य तुला देतो, पण तूं यांना मार असे जरी कोणी म्हटले तरी असे अनुचित कृत्य मी करणार नाहीं.

निहत्य धार्तराष्ट्रान्नः का प्रीतिः स्याज्जनार्दन ।
पापमेवाश्रयेदस्मान्हत्वैतानाततायिनः ॥ ३६ ॥

निहत्य, धार्तराष्ट्रान्, नः, का, प्रीतिः स्यात्, जनार्दन
पापम्, एव, आश्रयेत्, अस्मान, हत्वा, एतान् आततायिनः

हे जनार्दना, धृतराष्ट्राच्यापुत्रांस मारून आमचे काय प्रिय होईल ?
या आततायी लोकांना मारून आम्हीं पापाचेंच भागी होणार.

जरि आजि एथ ऐसें कीजे । तरि कवणाचां मनीं उरिजे ।
सांघें मुख केवि पाहिजे । तूझें कृष्णा ॥ २२७ ॥

जर मी आज येथे असे करू लागलो तर आम्हां विषयी कोणाच्या मनात
आदर राहील ? आणि तुला तोंड दाखविणे आम्हांला प्रशस्त वाटेल का ?

जरि वधु करुनु गोत्राचा । तरि वसैठा होइन दोखांचा ।
मग जोडलासि तूं हातिंचा । दूरि होंसी ॥ २२८ ॥

जर मी गोत्रजांचा वध केला, तर सर्व दोषांचे मी वसतिस्थान हाईन,
आणि भगवंता. तू जो मला सखा म्हणून लाभला आंहेस तो दुरावशील

कुळहरणी पातके । तियें आंगीं जडति अशेषें ।
तेव्हळि तूं कवणें कें । देखावासि ॥ २२९ ॥

कुलक्षय केला असतां अनंत पातकें लागतात;
अशा प्रसंगीं तुला कोणीं कोठे पाहावें ?

जैसा उद्यानामाझि अनळु । संचरला देखौनि प्रबळु ।
क्षणु एकु कोकिळु । स्थिर न्हवे ॥ २३० ॥

उद्यानात वणवा लागला तर एरव्ही तिथे
रमणारा कोकिळ पक्षी फिरकतही नाही.

कां सकर्दमु सरोवरू । अवलोकुनियां चकोरु ।
न सेवितु अव्हेरु । करुनि निगे ॥ २३१ ॥

किंवा तलावात चिखल झालेला पाहून चकोरपक्षी
त्यांत न राहतां तोंड फिरवून दुसरीकडे जातात,

तियापरीं तूं देवा । मग झांकउं नैयेसि मावा ।
जरि पुण्याचा ओलावा । नाशिजैल ॥ २३२ ॥

तसाच, हे देवा, जर माझ्या ठिकाणचा पुण्यांचा ओलावा
नाहींसा झाला, तर तू मला फसवून मायेने दिसेनासा होशील.

तस्मान्नार्हा वयं हन्तुं धार्तराष्ट्रान्स्वबान्धवान् ।
स्वजनं हि कथं हत्वा सुखिनः स्याम माधव ! ॥ ३७ ॥

तस्मात्, न, अर्हाः, वयम्, हन्तुम्, धार्तराष्ट्रान्, स्वबान्धवान्
स्वजनम्, हि, कथम् हत्वा, सुखिनः, स्याम, माधव

यासाठीं हे माधवा, आपल्या बांधवांस - या कौरवांस मारणें हे आम्हांला
योग्य नाही, आपल्या कुटुंबियांस मारून आम्ही कसे सुखी होऊं ?

ह्मणौनि मीं हें न करिं । ईये संग्रामीं शस्त्र न धरीं ।
हें कीडाळ बहुतीं परीं । दीसतसे ॥ २३३ ॥

म्हणून ही गोष्ट मी कधी करणार नाही व या युद्धात शस्त्र ही हातात धरणार
नाही. कारण, हें कृत्य बहुत प्रकारांनीं निंद्य आहे असें मला वाटतें;

तुजसिं अंतराऊँ होइल । मग सांघें आमचें काइ उरैल ।
तेणें दुःखें चि हियें फूटैल । तुआंविण ॥ २३४ ॥

तू अंतरलास तर आमचे असे या जगात काय उरेल ?
हे कृष्णा, तुझ्यावांचून त्या दुःखानें आमचे हृदय दुभंग होईल !

ह्मणौनि कौरव हे वधिजति । मग आह्मीं भोग भोगिजति ।
हे असो मातु अघडती । अर्जुन ह्मणे ॥ २३५ ॥

म्हणून कौरवांना मारावे व मग राज्यभोग भोगावे
ही गोष्ट शक्य नाही, असे अर्जुनाने सांगितले.

यद्यप्येते न पश्यन्ति लोभोपहतचेतसः ।
कुलक्षयकृतं दोषं मित्रद्रोहे च पातकम् ॥ ३८ ॥

यद्यपि, एते, न, पश्यन्ति, लोभ, उपहत, चेतसः,
कुलक्षय, कृतम्, दोषम्, मित्रद्रोहे, च, पातकम्

लोभामुळें बुध्दिभ्रष्ट झालेले हे लोक, कुलक्षयानें होणारा
दोष व मित्रांशीं वैर केल्यानें लाभणारें पातक पहात नाहींत,

कथं न ज्ञेयमस्माभिः पापादस्मान्निवर्तितुम् ।
कुलक्षयकृतं दोषं प्रपश्यद्भिर्जनार्दन ! ॥ ३९ ॥

कथम्, न, ज्ञेयम्, अस्माभिः, पापात्, अस्मात्, निवर्तितुम्,
कुलक्षयकृतम्, दोषम्, प्रपश्यद्भिः, जनार्दन

हे जनार्दना, कुलक्षयामुळें निर्माण होणारा दोष जाणणारे जे आम्ही,
त्यांनी देखील या पापापासून दूर होण्याचा कां बरे विचारकरूं नये ?

हे अभिमानमदें भूलले । जर्‍हीं पां संग्रामा आले ।
तर्‍हीं आह्मीं हित आपुलें । जाणावें लागे ॥ २३६ ॥

हे कौरव अभिमानाच्या मदानें चुकलेले असले आणि लढाईसाठी
आले तरी आम्ही आंमचे हित कशात आहे ते पाहिले पाहिजे,

हें ऐसें कैसें करावें । जें आपुले आपण मारावे ।
जाणतां केवि सेवावें । काळकूट ॥ २३७ ॥

आपणच आपला गोतावळा मारावा, असेंकृत्य आम्हीं कसें
करावें ? असें पहा कीं, समजून उमजून काळकूट विष कसे प्यावें ?

मार्ग्रे चि चालतां । पुढां सिंहु दीसे अवचिता ।
तो चूके तंवरि चुकवितां । वांचिजे कीं ॥ २३८ ॥

अहो, वाटेने जात असतां, जर एखादा सिंह पुढे आडवा
आला त्याला दुरूनच चुकवून जाणे हेंच श्रेयस्कर आहे.

आतां असता प्रकाशु सांडावा । मग अंधकूपु आश्रावा ।
तरि तेथें कवणु देवा । लाभु सांघैं ॥ २३९ ॥

असलेला उजेड टाकून अंधकूपाचा आश्रय केला तर, देवा,
त्यापासून काय लाभ होईल हें तुम्हीच सांगा बरें !

कां समोर आगि देखौनि । जरि न वचिजे चि ऊँसंडुनि ।
तरि क्षणा येका कवळुनि । जाळूं शके ॥ २४० ॥

आणि समोर अग्नी आहे. तो पाहताच त्याला टाळून बाजूने निघून
गेलों नाहीं, तर तो एका क्षणांत आपल्यास घेरून जाळून टाकील.

तैसे दोख हे मूर्त्त । आंगिं वाजों असति पांत ।
हें जाणतां केवि एथ । प्रवर्त्तावें ॥ २४१ ॥

त्याप्रमाणें, हे मूर्तिमंत दोष आम्हांला लागतील
असें कळल्यावरही या महायुध्दाला का प्रवृत्त व्हावे ?

कुलक्षये प्रणश्यन्ति कुलधर्माः सनातनाः ।
धर्मे नष्टे कुलं कृत्स्नमधर्मोऽभिभवत्युत. ॥ ४० ॥

कुलक्षये, प्रणश्यन्ति, कुलधर्माः,सनातनाः,
धर्मे, नष्टे, कुलम्, कृत्स्नम्, अधर्मः, अभिभवति, उत

कुलाचा नाश झाला असता सनातन कुलधर्म नष्ट होतात, धर्म
नष्ट झाला म्हणजे सर्व कुलावर अधर्माचाच पगडा बसतो.

जैसें काष्टें काष्ट मथिजे । तेथ वन्हि एकु उपजे ।
तेणें काष्टजात जाळिजे । प्रज्वळलेनि ॥ २४२ ॥

ज्याप्रमाणें लाकडानें लांकूड घासलें असता तेथें एक अग्नी उत्पन्न
होतो, आणि तो भडकला म्हणजे सर्व जंगलातील लाकडे जाळतो.

तैसें गोत्रिं चि परस्परें । जरि वधु घडे मत्सरें ।
तरि तेणें दोषें महाघोरें । कुळ चि नाशे ॥ २४३ ॥

त्याप्रमाणें मत्सरामुळें एकाच गोत्रांत जर परस्परांचा वध
घडला, तर त्या घोर पापाने सर्व कुळाचाच नाश होतो.

ह्मणौनु एणें पापें । वंशजधर्म लोपे ।
मग अधर्म चि आरोपे । कुळामाजि ॥ २४४ ॥

म्हणून या पापाने वंशपरंपरागत आलेल्या कुळधर्माचा
लोप होतो. आणि मग कुळांमध्यें अधर्मच माजतो.

अधर्माभिभवात्कृष्ण प्रदुष्यन्ति कुलस्त्रियः ।
स्त्रीषु दुष्टासु वार्ष्णेय ! जायते वर्णसंकरः ॥ ४१ ॥

अधर्म, अभिभवात्, कृष्ण, प्रदुष्यन्ति कुलस्त्रियः,
स्त्रीषु, दुष्टासु, वार्ष्णेय, जायते, वर्णसङ्कर

हे कृष्णा, अधर्म प्रबल झाला असतां, कुलस्त्रिया बिघडतात
आणि हे वार्ष्णेया, स्त्रिाया बिघडल्यानें वर्णसंकरः उत्पन्न होतो.

तेथ सारासार विचारावें । कव्हणें काइ आचरावें ।
जेणें विधिनिषेध आघवे । पारुखति ॥ २४५ ॥

असें झाल्यावर मग सारासार विचार, योग्यायोग्य आचरण, कर्तव्याकर्तव्य
वगैरे गोष्टी दूर राहतात. अशा रीतीने सर्व विधिनिषेध बंद पडतात.

असता दीपु धवडिजे । मग अंधकारिं राहाटिजे ।
तरि उजू चि आडळिजे । जेयापरि ॥ २४६ ॥

जवळ असलेला दिवा मालवून मग अंधारांत वावरूं लागलें
तर चांगल्या जागींही ज्याप्रमाणें अडखळण्याचा प्रसंग येतो;

तैसा कुळीं क्षयो होये । तेव्हळिं आदिधर्मु जाए ।
मग आन काहीं आहे । पापावांचौनि ॥ २४७ ॥

त्याप्रमाणे, कुलक्षयामुळे कुलधर्म नष्ट झाल्यावर मग
त्या ठिकांणीं पापावाचून दुसरे काय असणार ?

जैं यमनियम ठाकति । तैं इंद्रियें सैरा विचरति ।
ह्मणौनि व्यभिचार घडति । कुळस्त्रियां ॥ २४८ ॥

मन व इंद्रियें यांचा निग्रह होईनासा झाला म्हणजे इंद्रियें स्वैर
वर्तन करू लागतात, म्हणून कुलिनस्त्रियात व्यभिचार सुरु होतो.

उत्तम अधमीं संचरति । वर्णावर्ण मिसळति ।
तेथ समूळ उपडति । जातिधर्म ॥ २४९ ॥

उच्च वर्णाच्या स्त्रियांचा नीच वर्णाच्या लोकांत संचार होतो; अशा रीतीनें
वर्णसंकर होतो, व त्या योगानें सर्व ज्ञातिधर्म समूळ नाहींतसे होतात,

जैसें चोहटांचेया बळी । पावति सैरा काउळीं ।
तैसीं महापापें कुळि । प्रविशति ॥ २५० ॥

कावळे जसे चव्हाट्यावर ठेवलेल्या बळीवर चोहोंकडून झडप घालतात,
त्याप्रमाणे जातिधर्म लोपले असता कुलामध्येही चोहोकडून पापे शिरतात.

संकरो नरकायैव कुलघ्नानां कुलस्य च ।
पतन्ति पितरो ह्येषां लुप्तपिण्डोदकक्रियाः ॥ ४२ ॥

संकरः, नरकाय, एव, कुलघ्नानाम्, कुलस्य, च,
पतन्ति, पितरः, हि, एषाम्, लुप्त, पिण्ड, उदक, क्रियाः

अशा वर्णसंकराने कुलाला व कुलांचा नाश करणाऱ्यांना नरकप्राप्ती होते व कुलातील
पिंडदान तर्पणादि क्रियांचा लोप झाल्यामुळें त्यांचे पितर सुद्धा पतन पावतात.

मग कुळा तेया अशेखा । आणिक कुळघातकां ।
एरएरां नरका । जाणें आथि ॥ २५१ ॥

मग त्या संपूर्ण कुळाला व कुळाचा घात
करणाराला अशा दोघांनाही नरकात जावे लागते.

देखैं वंशवृद्धि समस्त । इयापरि होए पतित ।
मग वोवांडिति स्वर्गस्थ । पूर्वपुरुष ॥ २५२ ॥

पहा, याप्रमाणे सर्व वंशच पतीत होतो व मग पूर्वज स्वर्गात असले
तरी तेही स्वर्गातून पतन होऊन नरकातच वंशापाशी येतात.

जेथ नित्यादि क्रिया ठाके । नैमित्तिक कर्म पारुखे ।
तेथ कव्हणा तिळोदकें । कवण अर्पी ॥ २५३ ॥

कारण जेथें नित्य व नैमित्तिक अशीं दोन्ही धर्मकृत्यें नष्ट
झालीं, तेथें श्राध्दकर्म करून कोण कोणाला तीलोदक देणार ?

तरि पितर काइ करिति । कैसेनि स्वर्गि वसति ।
ह्मणौनि ते ही येंति । कुळापासिं ॥ २५४ ॥

मग पितरांनीं काय करावें व स्वर्गलोकीं कसें
टिकावें ? म्हणून ते देखील भ्रष्ट कुळापाशीं येतात.

जैसा नखाग्रिं व्याळु लागे । तो शिखांत पावे वेगें ।
तेविं आब्रह्म कुळ आघवें । आल्पविजे ॥ २५५ ॥

ज्याप्रमाणें नखाच्या टोंकाला साप चावला, म्हणजे त्याचें विष जसे मस्तकात चटकन
चढते तसा या पापदोषानें अगदीं मूळपुरुषापर्यंत सर्व कुळविस्तार व्यापिला जातो.

दोषैरैतैः कुलन्घानां वर्णसकंरकारकैः
उत्साद्यन्ते जातिधर्माः कुलधर्माश्च शाश्वताः ॥ ४३ ॥

दोषैः, एतैः, कुलघ्नानाम्, वर्णसङ्करकारकैः
उत्साद्यन्ते, जातिधर्माः, कुलधर्माः, च, शाश्वताः

वर्णसंकर उत्पन्न करणाऱ्या ह्या कुलघातक पुरुषांच्या
दोषांमुळें, सनातन असे जातिधर्म व कुलधर्म नष्ट होतात.

उत्सन्नकुलधर्माणां मनुष्याणां जनार्दन ! । नरके नियतं वासो भवतीत्यनुशुश्रुम. ॥ ४४ ॥	उत्सन्न, कुलधर्माणाम्, मनुष्याणाम्, जनार्दन, नरके, नियतम्, वासः, भवति, इति, अनुशुश्रुम

हे जनार्दना, कुलधर्मांचा नाश झालेल्या मनुष्यांना अनंत काळापर्यंत
नरकवास भोगावा लागतो, असें आम्ही ऐकलें आहे.

अहो बत महतत्पापं कर्तुं व्यवसिता वयम् । यद्राज्यसुखलोभेन हंतुं स्वजनमुद्यताः ॥ ४५ ॥	अहो, बत, महत्, पापम्, कर्तुम्, व्यवसिताः, वयम्, यत्, राज्यसुखलोभेन, हन्तुम्, स्वजनम्, उद्यताः

आम्ही राज्यसुखाच्या लोभाने आपल्या बांधवांस मारण्यास उद्युक्त
झालो, हें आम्हीं मोठें पाप करण्यास तयार झालो आहोत !

देवा अवधारीं आणिक एक । एथ घडे महापातक । जें संगदोषें हें लौकिक । भ्रंश पावे ॥ २५६ ॥	देवा ! आणखी एक महापातक यात घडते, ते ऐका. या पतित झालेल्या एका कुळाच्या दुष्ट संगाने लोकांचे आचारविचार भ्रष्ट होतात.
जैसा घरिं आपुला । वनिवसें वन्हि लागला । तो आणिका हीं पाजळला । जाळौनि घाली ॥ २५७ ॥	ज्याप्रमाणे घराला आग लागून आणि तो अग्नी पेटल्यावर घराचे दुसरेही भाग जाळून टाकतों,
तैसिया तिया कुळसंगती । जे जे लोक प्रवर्त्तति । ते हि बाधा पावति । निमित्तें एणें ॥ २५८ ॥	त्याप्रमाणे, अशा कुलांचा ज्या लोकांस सहवास घडतो, त्यांनाही त्यांच्या संगतीच्या योगानें पातक लागतें.
तैसें नाना दोषीं संकुळ । अर्जुन ह्मणे तें कुळ । महाघोर केवळ । निरय भोगी ॥ २५९ ॥	अर्जुन म्हणतो, त्याप्रमाणें अनेक दोषांमुळे मग त्या सर्व कुळाला भयंकर नरक भोगावा लागतो.
पडलेया तिये ठांइं । कल्पांतीं हीं उकलु नाहिं । एसणें पंतन कुळक्षयिं । अर्जुन ह्मणे ॥ २६० ॥	अर्जुन आणखी म्हणतो, त्या नरकांत पडल्यानंतर मग कल्पांतीही तेथून त्याची सुटका होत नाही. असें हें पतन कुलक्षयामुळें भोगावे लागतें.
देवा हें विविध कानीं अइकिजे । परिं अझुइंवरि त्रास नुपजे । हियें वज्राचें हें काइ कीजे । अवधारीं पां ॥ २६१ ॥	देवा रे, ऐक, इतकें हें आपल्या कानांनीं एकतो आहेस, तरी अजून तुला उबग आली नाहीं, तर तूं आपलें हृदय वज्राचें केलें आहेस काय ?

अपेक्षिजे राज्यसुख । जेयालागि तें तंव क्षणिक ।
ऐसे जाणतां हीं दोख । अव्हेरुं ना ॥ २६२ ॥

ज्या देहाकरिता या राज्यसुखाची इच्छा करायची तो देह क्षणिक
आहे हे कळत असूनही आम्ही हे पापकृत्य कां टाळीत नाही ?

जें हे वडिल सकळ आपुले । वधावेया दीठि सूदले ।
सांघे पां काइ थेकुलें । घडलें आह्मां ॥ २६३ ॥

अहो, या सर्व वडील माणसांना मारण्याचा हेतू मनांत धरून, आम्हीं
त्यांच्याकडे नजर टाकली, हे पापतरी लहानसहान आहे का, सांग बरे !

यदि मामप्रतीकारमशस्त्रं शस्त्रपाणयः ।
धार्तराष्ट्रा रणे हन्युस्तन्मे क्षेमतरं भवेत् ॥ ४६ ॥

यदि, माम्, अप्रतीकारम्, अशस्त्रम् शस्त्रपाणयः
धार्तराष्ट्राः, रणे, हन्युः, तत्, मे, क्षेमतरम् भवेत्

निःशस्त्र होऊन प्राणसंरक्षणार्थ मी कांहीं प्रयत्न करीत नसतांना जरी या
शस्त्रधारी कौरवांनी माझा वध केला, तरी तें मला कल्याणप्रदच होईल.

आतां इयावेर्‍हिं जें जिआवें । तेयापासौनि हें बरवें ।
जें शस्त्रें संडौनु साहावे । बाण एयांचे ॥ २६४ ॥

असे पाप करून आम्ही जे जिवंत राहायचे त्यापेक्षा आपण
आपली शस्त्रे टाकून देऊन यांचे बाण सहन करणेच जास्त बरे.

इयावेर्‍हिं होए जेतुकें । तें मरण हीं वर नीकें ।
परि एणें कल्मषें । चाड नाहीं ॥ २६५ ॥

असे केल्यामुळें जरी मरण प्राप्त झालें, तरी तें चांगले,
परंतु यांचा वध करून पाप जोडण्याची माझी इच्छा नाही.

सञ्जय उवाच - एवमुक्त्वार्जुनः संख्ये रथोपस्थ उपविशत् ।
विसृज्य सशरं चापं शोकसंविग्नमानसः ॥ ४७ ॥

एवम्, उक्त्वा, अर्जुनः, सङ्ख्ये, रथोपस्थ, उपविशत्,
विसृज्य, सशरम्, चापम्, शोकसंविग्नमानसः

रणभूमीवर शोकाकुल चित्तानें अर्जुनानें असें म्हणून बाणासहित
धनुष्य टाकून देऊन तो रथाच्या मागील भागांत जाऊन बसला.

ऐसें तिये अवसरीं । अर्जुनु बोलिला समरीं ।
संजयो ह्मणे अवधारीं । धृतराष्ट्रातें ॥ २६६ ॥

संजय म्हणतो - राजा धृतराष्ट्रा ! याप्रमाणे त्या युध्दाचे
ठिकाणी अर्जुन, भगवान् श्रीकृष्णाला म्हणाला, पहा.

मग अत्यंत उद्वेगला । नधरे गहिवरु आला ।
तेथ उडी घातली खालां । रथौनियां ॥ २६७ ॥

आणि मग अत्यंत उदासीन झाला, व अनिचार
गहिंवर येऊन त्यांनें. रथावरून उडी टाकली.

जैसा राजकुमरु पदच्युतु । सर्वथा होये उपहतु ।
कां रवि राहुग्रस्तु । प्रभाहीनु ॥ २६८ ॥

जसा पदच्युत झालेला राजपुत्र सर्वपरी निस्तेज व्हावा,
किंवा राहूने ग्रास केल्यामुळें सूर्य प्रभाहीन व्हावा.

ना तरि महासिद्धिसंभ्रमें । जींतला तापसु भ्रमें ।
मग आकळूनि कामें । दिनु कीजे ॥ २६९ ॥

अथवा महासिध्दीच्या मोहाने पछाडलेला तपस्वी भुलतो
आणि मग कामनेच्या तडाख्यात सांपडून दीन होतो

तैसा तो धनुर्द्धरु । अत्यंत दुःखें जर्जरु ।
दीसे तेथ राहवरु । त्यजिला तेणें ॥ २७० ॥

त्याप्रमाणे त्यानें जेव्हां रथाचा त्याग केला,
तेव्हां तो अर्जुन दुःखाने फार पिडलेला दिसला.

मग धनुषबाण सांडिले । नधरत अश्रूपात आले ।
ऐसें आइकैं तेथ वर्त्तलें । संजयो ह्मणे ॥ २७१ ॥

संजय म्हणतो, राजा, आणखी असें झालें कीं, त्यानें धनुष्यबाण
टाकून दिले. व त्याच्या डोळ्यांतून सारख्या अश्रुधारा चालल्या.

आतां यावरि वैकुंठनाथु । देखौनि अखेदु पार्थु ।
कवणीपरी परमार्थु । निरोपील ॥ २७२ ॥

आता वैकुंठनाथ श्रीकृष्ण अशा प्रकारे पार्थ खिन्न
झालेला पाहून परमार्थ कसा समजावून सांगेल,

ते सविस्तर पुढां कथा । अति सकौतुक आइकतां ।
जें ज्ञानदॐ ह्मणैल आतां । निवृत्तिदासु ॥ २७३ ॥

ती आतां पुढें येणारी सविस्तर कथा ऐकावयास फार कौतुककारक
आहे, असें श्रीनिवृत्तिनाथांचे शिष्य ज्ञानदेव म्हणतात.

ॐतत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे अर्जुनविषादो नाम प्रथमोऽध्यायः